शनिवार, 13 ऑगस्ट 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 19
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SATURDAY 13 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-19 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5

# सरपंचांची निवड थेट जनतेतून होणार

## राज्यातील 608 ग्रामपंचायतींसाठी 18 सप्टेंबरला मतदान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यातील 608 ग्रामपंचायतींसाठी 18 सप्टेंबरला मतदान होणार असून त्या संबंधीचे परिपत्रक आज जारी करण्यात आलं आहे. यामध्ये थेट सरपंचपदाचाही समावेश असून 51 तालुक्यातील 608 ग्रामपंचायतींसाठी हा नियम लागू असेल. त्यासाठी संबंधित ठिकाणी आजपासून आचारसंहिता लागू झाली असून 19 सप्टेंबर 2022 रोजी मतमोजणी होईल अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज केली.**

सर्वोच्च न्यायालयाच्या 17 मे 2022 रोजीच्या आदेशानुसार पावसामुळे निवडणूक कार्यक्रम बाधित होण्याची शक्यता कमी असलेले 51 तालुके निवडून तेथील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याचबरोबर निवडणूक कार्यक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अतिवृष्टी किंवा पूर परिस्थितीसारखी नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास त्याबाबत राज्य निवडणूक आयोगास तात्काळ अहवाल सादर करावा, असे आदेशही संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार संबंधित तहसीलदार 18 ऑगस्ट 2022 रोजी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील. या निवडणुकीसाठी 24 ऑगस्ट 2022 ते 1 सप्टेंबर 2022 या कालावधीत अर्ज दाखल करण्याचा कालावधी असेल. या दरम्यान शासकीय सुट्टीमुळे 27, 28 आणि 31 ऑगस्ट 2022 रोजी नामनिर्देशनपत्र दाखल करता




येणार नाहीत.

**असा असेल निवडणूक कार्यक्रम**

18 ऑगस्ट रोजी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध.
24 ऑगस्ट ते 1 सप्टेंबर या दरम्यान अर्ज दाखल करण्याचा कालावधी.
2 सप्टेंबर रोजी अर्जाची छाननी.
6 सप्टेंबर दुपारी 3 वाजेपर्यंत अर्ज माघारीची वेळ
18 सप्टेंबर रोजी मतदान
19 सप्टेंबर रोजी निकाल

### विविध जिल्ह्यांत निवडणूक होणाऱ्या जिल्हा आणि तालुकानिहाय संख्या

नंदुरबारः शहादा- 74 आणि नंदुरबार- 75, धुळेः शिरपूर- 33. जळगावः चोपडा- 11 आणि यावल- 02. बुलढाणाः जळगाव (जामोद)- 01, संग्रामपूर- 01, नांदुरा- 01, चिखली- 03 आणि लोणार- 02. अकोलाः अकोट- 07 आणि बाळापूर- 01. वाशीमः कारंजा- 04. अमरावतीः धारणी- 01, तिवसा- 04, अमरावती- 01 आणि चांदुर रेल्वे- 01. यवतमाळः बाभुळगाव- 02, कळंब- 02, यवतमाळ- 03, महागाव- 01, आर्णी- 04, घाटंजी- 06, केळापूर- 25, राळेगाव- 11, मोरेगाव- 11 आणि झरी जामणी- 08. नांदेडः माहूर- 24, किनवट- 47, अर्धापूर- 01, मुदखेड- 03, नायगाव (खैरगाव)- 04, लोहा- 05, कंधार- 04, मुखेड- 05, आणि देगलूर- 01. हिंगोलीः (औंढा नागनाथ)- 06. परभणीः जिंतूर- 01 आणि पालम- 04. नाशिकः कळवण- 22, दिंडोरी- 50 आणि नाशिक- 17. पुणेः जुन्नर- 38, आंबेगाव- 18, खेड- 05 व भोर- 02. अहमदनगरः अकोले- 45. लातूरः अहमदपूर- 01. सातारा: वाई- 01 आणि सातारा- 08. कोल्हापूरः कागल- 01. एकूणः 608

# भाजपा प्रदेशाध्यक्षपदी बावनकुळे तर मुंबईची जबाबदारी शेलारांकडे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील सत्तांतरानंतर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील हे मंत्री झाल्याने आता नवीन प्रदेशाध्यक्ष कोण याची चर्चा जोरात सुरू असतानाच माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्षपदासाठी माजी मंत्री आशिष शेलार, चंद्रशेखर बावनकुळे, आ.राम शिंदे आणि माजी मंत्री डॉ.संजय कुटे यांची नावे चर्चेत होती. चौघांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. त्यामुळे त्यांच्या नावाची प्रदेशाध्यक्षपदासाठी चर्चा सुरू झाली.



भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रदेशाध्यक्षपदी तर मुंबई अध्यक्षपदी आशिष शेलार यांच्या नियुक्तीचे पत्र काढले आहे. राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांच्या सहीने हे पत्र देण्यात आले. भाजपच्या श्रेष्ठींनी बावनकुळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूरचे आणि बावनकुळे हेही नागपूरचेच. त्यामुळे उपमुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्षपद हे एकाच शहरात दिले जाणार नाही असेही बोलले जात होते. तथापि, ओबीसी चेहरा म्हणून बावनकुळे यांना संधी देण्याचा विचार समोर आला.

फडणवीस सरकारच्या काळात बावनकुळे यांच्याकडे ऊर्जा आणि उत्पादन शुल्क ही दोन महत्त्वाची खाती होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत बावनकुळे यांना भाजपाने कामठी मतदारसंघातून उमेदवारी दिली नाही. फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बावनकुळे यांच्या उमेदवारीसाठी सर्व प्रकारचे प्रयत्न केले पण श्रेष्ठींनी त्यांचा पत्ता कापला. बावनकुळे यांच्या पत्नीस उमेदवारी द्यावी असा पर्याय तेव्हाच समोर आला, पण श्रेष्ठींनी त्यांनाही उमेदवारी दिली नाही. कामठीत त्यांच्याऐवजी भाजपचे जुने कार्यकर्ते टेकचंद सावरकर यांना उमेदवारी दिली गेली व ते जिंकलेदेखील. तेव्हापासून बावनकुळे बाहेर फेकले गेले पण काहीच महिन्यात त्यांना विधान परिषदेची आमदारकी देवून त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्यात आले. तसेच भाजपचे प्रदेश सरचिटणीसपददेखील त्यांना देण्यात आले.

# जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी हल्ला, पोलीस पथकाला केले लक्ष्य, एक जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**अनंतनाग :** जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा एकदा हल्ला केल्याचे समोर आले आहे. अनंतनाग जिल्ह्यातील बिजबेहरा भागात दहशतवाद्यांनी पोलीस/सीआरपीएफच्या संयुक्त नाका पार्टीवर गोळीबार केला. या हल्ल्यात एक पोलीस जखमी झाला आहे. जखमी पोलिसाला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परिसरात नाकाबंदी करण्यात आली असून शोध मोहीम सुरू आहे.

याआधी बांदीपोरा जिल्ह्यात दहशतवाद्यांनी बिहारमधील एका स्थलांतरित मजुराची गोळ्या झाडून हत्या केली होती. काश्मीर झोनच्या पोलिसांनी सांगितले की, मध्यरात्री बांदीपोरा येथील सोडनारा संबलमध्ये बिहारमधील मधेपुरा येथील बेसाढ येथील रहिवासी मोहम्मद अमरेज, त्यांच्या मुलगा मोहम्मद जलील यांच्यावर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. यानंतर या दोघांना रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तेथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दहशतवाद्यांनी राजौरी जिल्ह्यातील



लष्कराच्या छावणीवर आत्मघाती हल्ला केला, ज्यात चार जवान शहीद झाले. सुरक्षा दलाच्या प्रत्युत्तरादाखल दोन दहशतवादीही ठार झाले. पोलिसांनी सांगितले की, दहशतवादी घातक 'स्टील कोअर' गोळ्यांनी सज्ज होते आणि चार तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या चकमकीत दोन्ही दहशतवादी मारले गेले. पोलीस महासंचालक दिलबाग सिंग यांनी सांगितले की, हल्ला करणारे दोघेही दहशतवादी हे जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचे असावेत. दोघांनी छावणीत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, पण ते मारले गेले. या कारवाईत भारतीय लष्कराचे सहा जवान जखमी झाले, त्यापैकी चार जवान नंतर शहीद झाले.

# बीएमसीत भगवा फडकवणारच

## उद्धव ठाकरे यांचे मुंबईतील माजी नगरसेवकांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेना भवनात माजी नगरसेवकांची बैठक घेतली. २०१७ साली मुंबई महापालिका निवडणूक आपण भाजपविरोधात लढलो होतो आणि जिंकलो होतो, याची आठवण करुन देताना आताही मुंबई महापालिकेवर भगवा फडकवणारच, असा निर्धार व्यक्त करताना नगरसेवकांनी येत्या काळात नेमके काय काम करायचे आहे? याचा प्लॅन उद्धव ठाकरेंनी आजच्या बैठकीत सांगितला.

एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे शिवसेना पक्षात मोठी पडझड पाहायला मिळतीये. तसेच भाजपासारखा तुल्यबळ प्रतिस्पर्धा समोर असल्याने शिवसेनेसमोर मुंबई महापालिका जिंकण्याचे मोठे आव्हान आहे. येत्या दोन महिन्यात मुंबई महापालिकेची निवडणूक होणार आहे. आज भाजपने मुंबई अध्यक्षपदाची जबाबदारी आशिष शेलारांच्या खांद्यावर देऊन एका अर्थाने प्रचाराचा नारळच फोडला



आहे. याच पार्श्वभूमीवर महापालिकेवर पुन्हा भगवा फडकविण्यासाठी उद्धव ठाकरेंनी सेनेच्या माजी नगरसेवकांना मार्गदर्शन केले.

मुंबई महापालिकेची निवडणूक २ महिन्यांवर येऊन ठेपली आहे. महापालिका निवडणुकीत भगवा फडकवणारच. गेल्या निवडणुकीत भाजपविरोधात लढलो होतो आणि जिंकलो होतो. याही वेळी आपण लढून जिंकू. आपल्या विभागात सातत्यपूर्ण काम करा, सतत वॉर्डमध्ये फिरा. लोकांच्या संपर्कात राहा. लोकांचे प्रश्न जाणून घ्या. कुणाच्याही आमिषाला बळी पडू नका, असे मार्गदर्शन उद्धव ठाकरे यांनी सेनेच्या माजी नगरसेवकांना केले. तसेच वॉर्ड पुनर्ररचना झाल्याने आरक्षण पुन्हा बदलण्याची शक्यता असल्याचे सांगत २०१७ च्या वॉर्ड रचनेला आपला आक्षेप असून आपण याविरोधात कोर्टात जाणार असल्याचे देखील उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

# स्त्रियांच्या स्वप्नांना भरारी घावी लागणार...

आधुनिक केसरी

शेकडो वर्षाच्या गुलामगिरीच्या जोखडातून भारतीय समाज मुक्त झाल्यानंतर सामाजिक गतिशीलतेत वाढ झाली. दिवसेंदिवस सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा अनेक क्षेत्रात विकासाच्या परिणामामुळे भारतीय स्त्रीच्या संदर्भात सकारात्मक बदल झाला. पं. जवाहरलाल नेहरू यांनी फ्रान्स देशाच्या एका नागरिकाचा हवाला देऊन म्हटले की, कोणत्याही देशाची स्थिती ही त्या देशातील स्त्रियांच्या स्थितीवरून स्पष्ट होते.

माझ्या मते हे विधान वास्तविकतेला धरून आहे. कारण भूतकाळातील स्त्रियांच्या स्थितीचा इतिहास लक्षात घेतल्यास स्त्रियांची स्थिती, कायदा, सामाजिक, सार्वजनिक अशा क्षेत्रात अत्यंत गंभीर होती. भारताच्या अमृत महोत्सवी वर्षात भारतीय स्त्रियांच्या वाटचालीचा निष्कर्ष काढला तर तो सकारात्मक म्हणावा लागेल.

सर्वच क्षेत्रात अलीकडील काळात भारतीय स्त्रियांनी बरीच क्रांती केलेली दिसते.

अलीकडेच भारतीय संसदेने काही विधेयके पारित करून कायद्याच्या आधारे स्त्रीला अनेक बंधनातून मुक्त केले आहे. अशा प्रकारे स्वतंत्र भारताच्या


प्राचार्य डॉ. आश्रू जाधव

पंचाहत्तर वर्षात स्त्रियांची स्थिती जरी सुधारली असली तरी अद्यापही वास्तविक जीवनात स्त्रियांना अनेक प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष समस्यांना आणि अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्या अडचणी नष्ट कराव्या लागतील. आर्थिक, शैक्षणिक, वैज्ञानिक क्षेत्रातही महिला आपली भूमिका ठामपणे वटवित आहे. पारंपारिक भारतीय समाजात चार भिंतीच्या आत राहणारी महिला सामाजिक, राजकीय, अर्थिक क्षेत्रात पदार्पण करीत आपला झेंडा मिरवीत आहे हे अभिमानास्पद आहे.

तर शिक्षणाच्या प्रचार प्रसारामुळे भारतीय महिलांमध्ये एक जागृती आली आहे. आर्थिक क्षेत्रातील पदार्पणामुळे संपत्तीत वाटा तसेच घटस्फोटाचा वैज्ञानिक अधिकार तिला मिळाला आहे. महिलांच्या सामाजिक स्थितीत बऱ्याच अंशी सुधारणा झाली असली तरी स्वातंत्र्यानंतर वाढता शिक्षण प्रसार आणि पाश्चिमात्य संस्कृतीकरणाने महिलांच्या सामाजिक परिस्थितीत पूर्णपणे बदल झालेले दिसतो.

आणि म्हणून समाजशास्त्रीय विचार केल्यास कुटुंब या पाठशाळेची ती प्रथम शिक्षिका म्हणून आपले कर्तव्य चोखपणे बजावत आहे.

याच भारतीय स्त्रियांनी वैज्ञानिक, राजकीय, पत्रकार, लेखिका,




कवयित्री, डॉक्टर, इंजिनिअर, उत्तम समाज सुधारक, शिक्षणतज्ज्ञ इत्यादी अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व निर्माण केलेले आहे. आर्थिक क्षेत्रातील विभिन्न उद्योग व्यवसायात पदार्पण करून तिने एक वेगळी प्रतिमा निर्माण केली आहे. म्हणूनच भारतीय महिलांच्या जीवनाला गेल्या 75 वर्षात विविध आयाम मिळत गेले ही अभिमानाची गोष्ट आहे असेच म्हणावे लागेल.


स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतीय स्त्रियांची दयनीय स्थिती विरोधात अनेक आंदोलने उभा राहिली. सर्वप्रथम 1929 च्या कायद्याद्वारे बालविवाह कायद्याने गुन्हा ठरला. 1978 मध्ये या कायद्यात सुधारणा करून विवाह वयात मुलगा 21 वर्षे मुलगी 18 वर्षे करण्यात आले. त्यांच्या सामाजिक विकासाला बळकटी मिळाली. तर भारतीय संविधान कायदा 1874 नुसार स्त्रियांना संपत्ती विषयक अधिकार प्रदान झाले.

परंतु असे असले तरी आजच्या गुंतागुंतीच्या परिस्थितीत आणि शीघ्र सामाजिक परिवर्तनाचा विचार केल्यास भारतीय महिलांच्या जीवनात मूलभूत आणि आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे.

नवीन समाज किंवा राष्ट्राचा विकास करण्यामध्ये स्त्रियांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. आणि काही अंशी यामुळे भारताची जडणघडण ही आधुनिकतेकडे होताना दिसत आहे. हीच महिला भारताच्या समाज विकासाची एक पथदर्शी ठरलेली दिसत आहे.

असे असतानाच तिला आणखी सक्षम करण्यासाठी, तिच्या स्वप्नांना उत्तुंग भरारी देण्यासाठी, तळागाळातील वंचित राहिलेल्या स्त्रीला उभारी देण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात जाहीर होणे आवश्यक आहे. या कृती कार्यक्रमात तळागळातील स्त्री, दलित, आदिवासीबहुल, शोषित पीडित स्त्री कोठेही मागे पडणार नाही याची काळजी घेतली तरच हा पथदर्शी प्रवास सार्थकी लागला असे वाटेल.

**(शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद)**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ‘ एक अवलिया गायक किशोरकुमार ...’

आधुनिक केसरी

आराधना या चित्रपटात किशोरकुमारने गायिलेले ‘ मेरे सपनों की रानी कब आयेगी तू..’ हे गीत जेव्हा पडद्यावर झळकते तेव्हा आपण अक्षरशः किशोरकुमार गातो आहे हे विसरूनच जातो आणि खरोखर अभिनेता राजेश खन्ना हे गीत म्हणतो आहे हे आहे किशोरकुमारच्या आवाजातले सामर्थ्य, आवाजातली जादू ! अशी त्याची अनेक गीते. राजेश खन्ना सारख्या नटाला सुपरस्टार करण्यात किशोरकुमारच्या गाण्यांचाही हात आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. किशोरकुमार गाताना त्याचा ‘ यॉडलिंग ‘ हा त्याचा वेगळा फंडा काही गाण्यांसाठी वापरायचा. तो फारच लोकप्रिय झाला. त्याच्या गाण्यातील तो जणू आठवा स्वर झाला.



असे म्हणतात की त्याने गाण्याचे शास्त्रीय शिक्षण घेतले नव्हते. पण त्याची गाणी पाहिली आणि पुढे त्याने संगीत दिग्दर्शन केलेले चित्रपट पाहिले की या गोष्टीवर विश्वास बसणे कठीण जाते. चित्रपट सृष्टीतील महान अभिनेता अशोक कुमार यांचा किशोर हा धाकटा भाऊ. आभास कुमार गांगुली हे त्याचे मूळ नाव. अशोक कुमार यांची इच्छा त्याने अभिनेता व्हावे ही होती. सुरुवातीला अशोक कुमार यांच्या ओळखीने आणि धाकाने त्याने काही चित्रपटात कामेही केली. पण गायक होण्याची त्याची इच्छा जबरदस्त होती. साधारणपणे १९४६ च्या सुमारास त्याने चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. सुरुवातीला त्याच्या गाण्यावर त्या काळातील प्रसिद्ध गायक कुंदनलाल सहगल यांचा प्रभाव होता. पण त्याच्यातील गायकाचे सुप्त गुण सचिन देव बर्मन या महान संगीतकाराने हेरले आणि त्याला आपली स्वतंत्र शैली निर्माण करण्याचा सल्ला दिला. किशोरकुमारने चित्रपटसृष्टीत काही करण्याचे बाकी ठेवले नाही. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# सकारात्मक पालकत्व गरजेचे

आधुनिक केसरी

कडक शिस्तीने वाढवलेल्या मुलांमध्ये बंडखोरी, राग, आक्रमकता आणि अपराधीपणा यासारख्या असामाजिक वर्तणुकीच्या समस्या असतात. जरी काही पालकांना असे वाटते की कठोर पालकत्व चांगले वागणारी मुले तयार करणे. परंतू प्रत्यक्षात अधिक वर्तणुकीची समस्या असलेल्या मुलांची निर्मिती / प्रगती चांगली होते.

नियम स्थापित करणे आवश्यक आहे, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा शिस्त लावणे आवश्यक आहे, परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मुलाला खात्री असणे आवश्यक आहे की त्याची उपस्थिती आनंद देण्यासाठी पुरेसे आहे. ज्या मुलांचे त्यांच्या आईशी जवळचे नाते असते, त्यांची शाळेत चांगली कामगिरी होते. कारण आई देखील त्यांच्या मुलांची भावनिक बुद्धिमत्ता जोपासत असते. ती त्यांना मोकळे, त्यांच्या सभोवतालच्या आणि इतरांच्या भावनांबद्दल संवेदनशील राहण्यास शिकवत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कौटुंबिक सदस्यांमध्ये काळजी आणि ऐक्याची भावना विकसित करण्यासाठी वचनबद्धता हा एक महत्त्वाचा घटक आहे. सौम्य पालकत्व हा एक पालकत्वाचा दृष्टीकोन आहे, जो बाह्य दबावांऐवजी अंतर्गत इच्छेच्या आधारावर निवड करण्यासाठी तुम्ही आणि तुमच्या मुलामधील भागीदारीला प्रोत्साहित करतो. सकारात्मक पालकत्व हे परस्पर आदर, मुलाच्या सामाजिक आणि भावनिक विकासात सुलभता आणणे, स्तुती करणे, दृढ परंतु मैत्रीपूर्ण संवादासह स्पष्ट नियम स्थापित करणे आणि न्याय्य वागणूक याद्वारे साध्य करणे आहे.

अशा कुटुंबातील मुलांचा व्यक्तिमत्व विकास अत्यंत झपाट्याने आणि चांगल्याप्रकारे होत राहतो. सकारात्मक पालकत्व, संलग्न पालकत्व, बिनशर्त पालकत्व, आध्यात्मिक पालकत्व आणि हळू पालकत्व अशा स्वरूपातील पालकत्वामुळे मुलांचा मानसिक, बौद्धिक, शारीरिक, सामाजिक, वैचारिक, भावनिक पातळीवरील व्यक्तिमत्व विकास चागल्या प्रकारे होत राहतो.



आधुनिक केसरी

## होई रममाण | चित्त माझे ||

भक्ती विना भाव | कारण पापासी ||
बुडवी जनासी | दांभिक तो ||१||

भक्तीचा महिमा | जाणेल जो कोणी ||
तोच संत जनी | नांदताहे ||२||

भक्तीचा भूकेला | परब्रम्ह दाता ||
वर्णू काय कथा | भक्ती मुक्ती ||३||

भक्तीच्या उदरी | ज्ञानामृत फळ ||
चैतन्य रसाळ | मोक्ष देई ||४||

भक्तीचा महिमा | सांगे संतजन ||
होई रममान | चित्त माझे ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## ।। दासबोध स्तवन ।।

# सृष्टीकथन

आधुनिक केसरी



नमस्कार
मायेचे मोठे शस्त्र म्हणजे कल्पना, कल्पना ही माणसाला मिळालेली खुप मोठी शक्ति आहे. ती योग्य मार्गाने योग्य वळणावर वापरली तर अगदी ती तुम्हाला स्वस्वरूपापर्यन्त पोहचवते.
तुम्ही पण आत्मावलोकन करून शक्ति वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारणजर कल्पनेला अयोग्य वळण लागले तरती भ्रमाचे नानाप्रकार निर्माण करते. देवाच्या बाबतीत माणूस अगदी भ्रामक कल्पना करतो. त्यामुळे त्याला आत्मस्वरूपाचे दर्शन होत नाही. म्हणून परमार्थ साधला जात नाही. मूळ शुद्ध व निर्गुण स्वरूपामध्ये "मी एक आहे तो अनेक व्हावा" अशी एकच कल्पना झाली. पण तिच्या पोटी अनेक विश्व होतात आणि जातात. केवळ कल्पनेचाच पाया असलेल्या विश्वाला खरे पणा आणणे शक्य नाही. आता तेकसे ते पहा बरं अज्ञानी माणसाने बनवले ला सगुण देव कल्पनेने केलेला असतो.. अशा देवावर श्रद्धा ठेऊन भक्तिकेली आणि देवाला काही अपाय झाला तर भक्ताला मनापासून दुःख होते. तेव्हा भक्तांना झालेले दुःख बघवत नाही.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मनोजवं मारुततुल्यवेगमं
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद
सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# नात्यातील व्यवहार

आधुनिक केसरी

सुदर्शन चक्र शिशुपालाचे शर संधान केल्यावर कृष्णकडे परतत असताना कृष्णाच्या बोटाला छोटीशी जखम करून गेलं. जखम ही इतकी खोल की रक्ताची धार थांबेचना, शेवटी सुदर्शन चक्राचा वार तो, साक्षात प्रभूंवर झाला म्हणून काय त्याची तीव्रता कमी थोडीच होणार! राजवैद्य व त्यांच्या सहकाऱ्यांनी खूप धावपळ केली, लेप उगाळले, काढे पाजले पण तरीही काहीही उपयोग होईना, शेवटी नारद मुनी तिथं आले, म्हणाले प्रभू ही कुठली लीला तुमची. सारे उपाय थकले आता आपणच उपाय सांगावा. कृष्ण म्हणाला अरे नारदा लीला कसली त्यात, एक साधी जखम तर आहे होईल बरी आपोआप, त्याच एवढं काय घेऊन बसलात.

नारद म्हणतात प्रभू जो विश्वाचं कल्याण व्हावं म्हणून अहोरात्र झटतो आहे त्याच्या जखमेतून रक्ताची संतत धार वाहते आहे, त्या प्रभूला वेदना होत आहेत व आम्ही काहीच करायचे नाही म्हणता हे कसं शक्य होईल, कृपया उपाय सांगावा, केवळ आपणच यावर उपाय जाणता व यामागे आपली काहीतरी लीला असावी हे मी जाणून आहे.

नारदमुनी ऐकेचना तेव्हा शेवटी कृष्ण म्हणाला ठीक आहे नारदा ऐक तर उपाय, सुभद्रेच्या घरी जा व तिला म्हणावं तुळशीचा लेप दे, व तो लेप बोटाला बांधायला एक चिंधी दे, तिथं जर काम झालं नाही तर मग द्रौपदी कडे जा.



नारदमुनी सुभद्रेकडे गेले, लेप व चिंधी मागितली, सुभद्रेने दासींना आज्ञा केली की तुळशीचा रस काढा. तुळशीच्या रसाचा लेप तर तयार झाला, त्याला रत्नजडित सोन्याच्या भांड्यात ठेवण्यात आलं व नारदामुनींकडे सुपूर्त करण्यात आलं, नारद मुनी म्हणाले सुभद्रे अग लेप तर छान दिलास पण चिंधी कुठाय? सुभद्रा म्हणते अहो मुनिवर दासींनी खूप शोधलं पण माझ्या एवढ्या भरजरी वस्त्रालयात चिंधी कुठून मिळावी? नारदमुनी मनातल्या मनात हसले, प्रभूंची लीला त्यांना आता उमगली होती.

सुभद्रेचा निरोप घेऊन तिचा लेप न घेताच लगबगीने ते द्रौपदी कडे रवाना झाले, नारद मुनींनी मागणी करायचा अवकाश द्रौपदी ने त्वरित स्वतः तुळशीच्या पानांचा रस काढून लेप तयार केला, व पांडवांनी तिला भेट दिलेला त्रिभुवनातील सर्वाधीक किमतीचा असलेल्या शालुचा पदर फाडून त्याची चिंधी बनवताना शालू फुकट जाइल हा विचार देखील तिच्या मनाला शिवला नाही, मनात विचार होता केवळ आणि केवळ कृष्णाला लवकरात लवकर बरं कस वाटेल हा, असा लेप व चिंधी कृष्णाच्या बोटाला लावून त्याची रक्ताची धार तर लगेच थांबलीच, व जखम देखील भरून आली. या चिंधी चे मोल मी एक दिवस नक्की चुकवीन असे कृष्ण म्हणता झाला, व वस्त्रहरण होताना त्याच करंगळी तुन द्रौपदी ला वस्त्र पुरवीत राहिला.

रक्ताच्या नात्या पेक्षा ही कधी कधी मानलेली नाती अधिक जवळची ठरतात, जेव्हा नात्यात व्यवहार डोकावत नाही, फायदा तोटा यांचे गणित आड येत नाही, बेधडक जे काही करायचं ते केलं जातं, ती नाती खरी, बाकीचे फक्त व्यवहार. अशा नात्यांनी शरीराच्या जखमा भरल्या जातातच पण मनावर झालेले असंख्य वार ही या नात्याच्या एका फुंकरीने बरे होतात.

चिंधी बांधते द्रौपदी हरीच्या बोटाला...

# कुटुंबांमधील नातेसंबंधात लोकशाही मूल्ये रुजण्याची आवश्यकता : प्रा. मंगलाताई खिंवसरा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापुर :** पंचायत समिती विनायकराव पाटील सभागृह येथे आझादीका अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत महिलांसाठी वैजापुर तालुका प्रशासन यांच्या वतीने सामाजिक कार्यकर्त्या प्रा.मंगलाताई खिंवसरा यांच्याप्रमुख उपस्थितीत महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्या प्रा.मंगलाताई खिंवसरा यांनी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी गटविकास अधिकारी एच.आर. बोयनार, विस्तार अधिकारी अमेय पवार, सीडीपीओ रामेश्वर खडसे, एपीओ सतोष जाधव, संरक्षण आधिकारी सतिश कदम, मंडळ आधिकरी आशोक तांबूस, सुपरवायझर व्ही.आर. देशमुख, शांताराम मगर, संजय पगारे यांची प्रमुख होती.
यावेळी बोलताना प्रा.मंगलाताई खिंवसरा म्हणाल्या स्त्री पुरुष समानता, पितृसत्ता, आरोग्य हक्क, स्त्री-पुरुष विषमतेबद्दल आणि समानतेबद्दल पुरुष कसा विचार करतात? पुरुषांसोबत समानतेविषयक सातत्याने करीत असलेल्या कामातून निदर्शनास आलेली काही निरीक्षणे यावेळी मांडण्यात आली. मुळात विषमता, समानता, समता, हिंसाचार ही भाषाच पुरुषांच्या रोजच्या जगण्याची किंवा चर्चेची नसल्याचे दिसून येते अणि अशी भाषाच जेव्हा स्थापित नसते तेव्हा त्या विषयांबाबतचे चिंतन आपल्या कुटुंबात लोकशाही रुजत नाही. लोकशाही मूल्ये, भारतीय राज्यघटना या विषयी आपल्या कुटुंबीयांशी कधी चर्चा केली आहे का? जर आपण असे बोललो नसू तर त्याचा अर्थ आहे की आपल्या कुटुंबात भारतीय राज्यघटना हा विषय आपण केवळ संसदीय राजकारणाचा समजतो. मात्र कुटुंबांमधील नातेसंबंधात लोकशाही मूल्ये रुजण्याची शक्यता त्यामुळे दुरावताना दिसते. कुठल्याही विषयाची व्यापक चर्चा झाली पाहिजे. कोरोना काळात बालविवाह मोठ्या प्रमाणात झाले. योग्य वय कोणते यावर खल करणाऱ्या समाजाने, तज्ज्ञांनी व शासन यंत्रणेने स्त्री-पुरुष समानता, पुरुषत्वाच्या घातक धारणा, प्रेम व्यक्त करण्याच्या, स्वीकारण्याच्या, नाकारण्याच्या अहिंसक सकारात्मक पद्धती या विषयांच्या शिक्षणाचे गांभीर्य ओळखून पुरुषांना व त्यांच्या मानसिकतेला केंद्रस्थानी ठेवून समानता शिक्षणाचे धडे दिले पाहिजेत.
अर्थातच असे प्रयत्न करणे केवळ शासनाची जबाबदारी न ठरवता पालक, कुटुंबातील इतर सदस्य व समाजातील विविध संस्थांनीही यात पुढाकार घेतला पाहिजे. पुरुषी वर्चस्वाचे धडे मुलांना त्यांच्या लगेचच्या वातावरणात, म्हणजेच कुटुंबात व समाजात मिळत असतात. 'तू स्त्रीपेक्षा जास्त महत्त्वाचा व श्रेष्ठ आहेस' असं त्याला कुणी सांगत नाही, पण भावकी- गावकीतून त्याला हा संदेश आपसूकच मिळत जातो हे ओळखून गावकी-भावकीचा व्यवहारच समानतेवर आधारलेला झाला पाहिजे.
मुली आणि स्त्रियांना त्यांच्या हक्काची सुरक्षितता हा निकषही अग्रक्रमाने लावला पाहिजे. मन्याड खोर्यातील आदिवासीं महिला पुरुष दोघांच्या नावाने  सातबारा आहे. घरकुल योजने घर सुद्धा दोघांच्या नावाचे असले पाहिजेत करण नवरा बायकोची भांडण झाली की महिलाच घराबाहेर हाकलून दिल्या जाते. याचा त्रास महिलेला होतो. आशा प्रकारचा त्रास होऊ नयेत म्हणुन आमच्या गावात एकाही स्त्रीला भेदभाव सहन करावा लागणार नाही अथवा हिंसा केली जाणार नाही असे प्रयत्न आपल्या माध्यमातून झाले पाहिजेत. ढ समाज म्हणून आपणही मुली व स्त्रियांवर होणाऱ्या इतर सर्व प्रकारच्या भेदभावाला व हिंसाचाराला 'किरकोळ' अथवा 'चालायचंच' या श्रेणीमध्ये गृहीत धरतो. खरे पाहता मुली व स्त्रियांबद्दल भेदभाव व्यक्त करणारी, त्यांचे मानवी अवमूल्यन करणारी, त्यांची प्रतिष्ठा घालवणारी, त्यांच्या समान हक्कांचे उल्लंघन करणारी व त्यांना दुय्यम लेखणारी खासगी अथवा सार्वजनिक जीवनातील प्रत्येक घटना ही तितकीच निषेधार्य मानली पाहिजे. आशा विविध विषयांवर प्रकाश प्रा.मंगल खिंवसरा यांनी टाकला.
या महिला मेळाव्याचे प्रास्ताविक विस्तार अधिकारी अमेय पवार यांनी केले तर आभार गट विकास अधिकारी एच.आर. बोयनार यांनी मानले. यावेळेस आगंणवाडी सेविका आशा सेविका स्वंय साध्या समूहातील महिला यांची मोठ्या प्रमाणात उपस्थितीती होती.





# अन्नाची नासाडी थांबवली पाहिजे : विभाकर खांदेवाले

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे. आजही अन्नासाठी धडपड करणारे अनेक जण आपल्या आजूबाजूला आहेत. त्यामुळे अन्नाचे महत्त्व ओळखून त्याची नासाडी थांबवली पाहिजे. अन्नक्षेत्र ही संस्था अन्नाचे महत्त्व पटवून देण्यासाठी कार्य करत आहे. तसेच अन्नक्षेत्रच्या माध्यमातून गरजूवंताना वेगवेगळ्या प्रकारचे अन्न वाटप करण्यात येत असते. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त औरंगाबादेत आपण अन्नक्षेत्रचा हा उपक्रम राबवत आहोत. या मागचा उद्देश मुलामध्ये आनंद निर्माण व्हावा व त्यांना अन्नाचे महत्त्व कळावे हाच आहे. यापुढे अन्नक्षेत्रच्या वतीने असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत, असे प्रतिपादन अन्नक्षेत्रचे मराठवाडा प्रमुख तथा दै. आधुनिक केसरीचे सरव्यवस्थापक विभाकर खांदेवाले यांनी केले.
शहरातील एकनाथनगरमधील ब्लू स्काय इंटरनॅशनल शाळेत आज विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. प्रभू गोरे, राजू गायकवाड, शिवराम मस्के, प्राचार्या सौ.आम्रपाली मस्के, शिक्षिका वनिता दाभाडे, सविता आमराव, पौर्णिमा जोंधळे आदींची उपस्थिती होती. अन्नक्षेत्रच्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेत भव्य 'हर घर तिरंगा' रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र व राज्य सरकारच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत 11 ते 17 ऑगस्ट 2022 या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेतील आयुर्वेद, दंत, कृषी, तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात हे अभियान राबविण्यात आले.
यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासन निर्णयानुसार स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र संग्रामातील अज्ञात नायक, क्रांतीकारक यांच्या आठवणी तसेच देशभक्तीची भावना जनमानसात कायम राहावी उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे.
यावेळी प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, दंत महाविद्यालय संचालक डॉ. सुभाष भोयर, कृषि महाविद्यालय संचालक डॉ. दत्तात्रय शेळके, अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, दंत महाविद्यालय प्रभारी अधिष्ठाता डॉ. लता काळे, मानव संसाधन अधिकारी अशोक आहेर सिव्हिल इंजिनिअर राज तांबे पाटील, जनसंपर्क अधिकारी संजय पाटील यांच्यासह सर्व विभागप्रमुख, कार्यालय अधीक्षक आणि कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# धनलक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने इकोफ्रेंडली शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** धनलक्ष्मी महिला नागरी पतसंस्थेच्या वतीने, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण रजा रविवर्मा आर्ट्स कॉलेज औरंगाबाद चे प्राचार्य उदय भोईर व सहकारी यांच्या मार्फत देण्यात आले. या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन पैठण पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक किशोर पवार यांचे हस्ते करण्यात आले.
प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा संघचालक ॲड.गोरडे तसेच आयकॉन PARADISE चे प्रमुख संतोष तांबे, इनर व्हील अध्यक्षा अपर्णा गोरडे, या तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पतसंस्थेच्या अध्यक्षा रेखाताई कुलकर्णी या होत्या,याप्रसंगी उद्घाटक किशोर पवार यांनी पर्यावरण रक्षण हे राष्ट्रीय कार्य समजून प्रत्येकाने पर्यावरण पूरक सण साजरे करावेत, असे प्रतिपादन केले. या प्रशिक्षण शिबिरासाठी सुमारे 83 विद्यार्थिनी व महिला यांनी सहभाग नोंदविला होता. प्रास्ताविक प्रा. संतोष गव्हाणे यांनी केले तर सूत्रसंचालन समीर शुक्ल यांनी केले. आभार नलिनी देव व्यहाळकर यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे यशस्वीसाठी व्यवस्थापक रामचंद्र मुळे, दीपक सपकाळ, सारंग महाजन, अनिल गोसावी, संजय रावस, यांनी मेहनत घेतली.





पंतप्रधान मोदींच्या घोषणेला दुजोरा देत... औरंगाबादच्या उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर आणि प्रसिद्ध उद्योगपती सुनील किर्दक यांनी एका कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात काही... कलावंत... साहित्यिकांना... तिरंगा प्रदान करण्यात आला... त्यामध्ये कलावंत सुधीर कोर्टीकर यांना तिरंगा प्रदान करताना उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर व उद्योगपती सुनील किर्दक.



# भाजपचे गणित बिघडले ?

आधुनिक केसरी

नितीशकुमार यांनी बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ विक्रमी आठव्यांदा घेतली. कधी भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत, तर कधी राष्ट्रीय जनता दल तसेच काँग्रेसच्या आघाडीत ते सामील झाले आहेत. विरोधकांनी कितीही टीका केली तरी ७१ वर्षीय नितीशकुमार यांना बिहारच्या राजकारणातील जातीय समीकरणे पक्की ठाऊक आहेत. याच्याआधारेच सत्तेचे सोपान गाठता येते असा अनुभव आहे. अर्थात इतर तात्कालिक मुद्दे असतात, पण हा मुद्दा निर्णायक ठरतो. त्यामुळेच ही समीकरणे नेमकी समजून घेणे महत्त्वाचे ठरते. बिहारमध्ये लोकसभेच्या ४० जागा आहेत. खासदारांचे हे संख्याबळ पाहता राष्ट्रीय राजकारणातील बिहारचे महत्त्व लक्षात येईल. गेल्या लोकसभा निवडणुकीत नितीशकुमार व भाजप यांच्या आघाडीने ३९ जागा जिंकल्या होत्या. त्याला कारणीभूत जरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा असली, तरी उच्चवर्णीय, बिगरयादव ओबीसी तसेच दलित मतदार मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय लोकशाही आघाडीबरोबर राहिला हे स्पष्ट झाले. नितीश स्वत: कुर्मी या इतर मागासवर्गीय समाजातून येतात. कुर्मी तसेच कोयरी हे जवळपास ११ टक्के आहेत. हा घटक बऱ्यापैकी नितीशकुमार यांच्यामागे कायम राहिला आहे. त्याखेरीज महिला मतदार नितीश यांच्या पाठीशी राहतात असा अनुभव आहे. त्यामुळे नितीशकुमार ज्या बाजूला जातात तेथे विजय होतो त्याचा प्रत्यय २०१५ तसेच २०२०च्या विधानसभा निवडणुकीत आला. २०१५ मध्ये भाजपने जोरदार प्रचार केला होता, विशेषत: पंतप्रधानांनी मोठ्या प्रमाणात सभा घेतल्या होत्या, मात्र भाजपला २४३ पैकी केवळ ५३ जागा मिळाल्या होत्या. प्रमुख पक्षांशिवाय लढणाऱ्या भाजपला जातीय समीकरणे जुळवता आली नाहीत. त्यामुळेच नितीशकुमारांनी साथ सोडल्याने विरोधी आघाडी २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपसाठी बिहारमध्ये डोकेदुखी ठरू शकते. राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस तसेच भाकप (माले) या पक्षांची साथ नितीशना मिळणार आहेत. भाजपची भिस्त उच्चवर्णीयांवर असून, यात ब्राह्मण, कायस्थ, राजपूत हे १७ टक्के आहेत. तर काही प्रमाणात बिगरकुर्मी तसेच यादव वगळता इतर ओबीसी घटकांवर राहील. मात्र महाआघाडीपुढे ती अपुरीच आहे. चिराग पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षामुळे भाजप आघाडीत काही प्रमाणात दलित मते येतील, मात्र विरोधात भाकप (माले) काही विभागांत प्रभावी आहे. भाजपच्या राजकारणाला येथे शह बसेल. त्यातच जितनराम मांझी हेदेखील विरोधात गेल्याने अतिमागास मानल्या गेलेल्या समाजातून मतांची जुळणी करणे भाजपसाठी आव्हानात्मक आहे. बिहारमध्ये साधारणत: ११ टक्के यादव तसेच १४ टक्क्यांच्या आसपास मुस्लीम मतदार आहेत. हे मतदार मोठ्या प्रमाणात महाआघाडीच्या बाजूने जातील, असे विश्लेषकांना वाटते. यादव समुदायातील काही नेते भाजपकडे जरूर आहेत. मोदींना मानणारा काही प्रमाणात नवमतदार आहे. पण हे प्रमाण फारसे नाही. नितीशकुमार सोबतीला असल्याने मुस्लीम मतांचा काही टक्का भाजपला मिळत होता. मात्र आता पक्षाला त्यातही फारशी आशा नाही. शहनवाझ हुसेन यांच्यासारखे नेते पक्षाच्या महत्त्वाच्या पदांवर असले तरी समाजावर त्यांचा प्रभाव कितपत पडेल याची शंका आहे. सुशीलकुमार मोदी, रविशंकर प्रसाद, नंदकिशोर यादव, गिरिराज सिंह, आठ वेळा विधानसभेवर विजयी झालेले प्रेमकुमार हे नेते जिल्हा किंवा विभागापुरते आहेत. त्यामुळे जातीच्या मतांचे गणित पाहता महाआघाडीतील पक्षांचा चक्रव्यूह भेदणे तूर्त भाजपच्या चाणक्यांसाठी आव्हानात्मक आहे. पुरोगामी आणि विकासाच्या राजकारणाची भाषा बिहारमध्ये सारेच पक्ष करीत असले तरी जातीय समीकरणांवरच यशापयशाची सारी समीकरणे अवलंबून आहेत. यात आता हुकमाचे पत्ते भाजप विरोधकांकडे आहेत, त्यामुळेच २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बिहारमध्ये भाजपचा मार्ग बिकट आहे.

# संकल्प स्वातंत्र्यमय विचारांचा



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**हे वर्ष आपणा सर्वांसाठी अगदी आनंदाचा आहे. कारण यावर्षी आपण भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करणार आहोत. "15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिन" आपल्या कुणाच्याही परमोच्या आनंदाचा क्षण. ज्या वेळेला राष्ट्रगीताची धून शौर्य गीते कानावर पडतात त्यावेळेला आपल्या रोमरोमात राष्ट्रभक्तीचे बीज रुजले जातात, आपल्या डोळ्यात आनंदाश्रू तुंबळ गर्दी करतात आणि त्यांना आपण डोळ्याआड करत जी तिरंग्याला खणखणीत सलामी ठोकतो त्यावेळेला आपण किती नशीबवान आहोत याची जाणीव होते. आपण नशीबवान आहोत म्हणूनच, या देशांमध्ये जन्माला आलो या मातीमध्ये आपलं भाग्य उगवलं, या मातीतच आपण वाढलो आणि एक एक श्वास जगत फुलतोय.**

या गोष्टीचा आपणा सर्वांना नक्कीच अभिमान आहे; मात्र हे सारं आपण स्वतःशीच कबूल करताना भारत मातेला वंदन करताना आपण कधी स्वतःला विचारलं की आपण देशासाठी नेमकं काय केलं? या देशाचा वारसा डोईवर घेऊन चालताना आपण कुठल्या अभिमानाची नवी पायवाट चालतोय याचा शोध कधी आपण घेतला. देश झालाय, पण आपण झालोय का स्वातंत्र्य? कदाचित देशाच्या स्वातंत्र्याच्या दिवशीच आपल्याला आपल्या अंतरंगातून देशभक्तीची जाणीव होते आणि या दिवसानंतर पुन्हा ते चित्र, पुन्हा तीच कथा कदाचित एक दिवसासाठीच हे चित्र बदललं जातं आणि पुन्हा आपला रोजचाच पाढा घोकला जातो. आजूबाजूची माणसं अजूनही जुन्या विचारांचीच ती त्यांच्या विचारातून अजूनही स्वातंत्र्य झालेली नाही. आपली म्हणणी पटवत, आपलेच बोल खरे करत जुन्याच गोष्टी अजूनही तशाच कोरून ठेवलेल्या आहेत.

या विचारांच्या स्वातंत्र्यासाठी आपण कधी लढतोय? किंवा काळानुरूप होऊन गेलेले बदल आपण कधी पुन्हा आत्मसात करतोय? आपल्या जुन्या जातीपातीच्या भेदांच्या घोर अंधश्रद्धांच्या आडोशाला आणि जुन्या गैरसमजुतीच्या नशेच्या विळख्यात आणि त्यातून येणाऱ्या विपन्नावस्थेच्याही या जाचक बेड्यातून आपण कधी आणि कसे स्वतंत्र होणार? असाच प्रश्न पुन्हा पुन्हा पडतो. एकाच दिवशी आपल्या मनात आपल्या शरीरात जे शौर्य फुलून येतो ते अखंडित राहण्यासाठी आपण किमान प्रयत्न तरी करतो का? कदाचित ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं नकारार्थीच असेल, पण म्हणून काय यांना होकारार्थी करण्याचा एक प्रयत्नही न व्हावा. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करता करता आपण पुन्हा ती चुक न करता आपल्याच विचारांच्या पारतंत्र्यातून आपण एकदा स्वातंत्र्य व्हायला हवे. देश बदलतोय काळ बदलतोय हे म्हणणं जितकं सोपं वाटतंय तितक्याच पद्धतीने खऱ्या अर्थाने देश खरंच बदलला तर अब्दुल कलाम यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण व्हायला वेळ लागणार नाही.

ज्यावेळेला विचार बदलतात. त्यावेळेला खऱ्या अर्थाने देश बदलतो. म्हणूनच नवे बदल रुजायला हवे. त्याआधी एक पाऊल विचारांच्या बाजूनेही टाकायला हवं बदल अगदी सोपे आहेत याकरिता कुठलेही खर्चिक काम किंवा कुठलेही कष्ट घेण्याची अगदीच आवश्यकता नाही सोपी गोष्ट आहे. सुरुवात अगदी लहान गोष्टींपासून व्हायला हवी देश आणि पर्यावरण यांच्यासाठी काही करायची धडपड आपल्या मनात आली पाहिजे. पर्यावरण सुरक्षित ठेवण्यासाठी प्लास्टिकचा वापर कमी करावा. त्यामुळे पर्यावरण सुरक्षित राहील आणि पर्यावरण सुरक्षित राहिले तर नक्कीच त्याचाही फायदा आपल्या आरोग्यासाठी होईल.



झाडे लावली पाहिजे, किमान प्रत्येकाने ठरवलं तर या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या दिनी आपण एक झाड तरी लावलं पाहिजे. त्याला जगवलं पाहिजे त्याला वाढवलं पाहिजे. अशी प्रत्येकाने जर ठरवलं तर आपल्यालाच आपल्या देशामध्ये एक सुंदर परसबाग निर्माण करता येईल. कागदी पिशव्यांचा वापर कापडी पिशव्यांचा वापर केला पाहिजे. अनावश्यक वस्तू घेण्याचे टाळले पाहिजे, आवश्यक तेवढेच अन्न ताटात घेतले पाहिजे, अन्नाचा अपव्य टाळला पाहिजे, केर कचरा यांची विल्हेवाट करणे, सांडपाण्याची योग्य व्यवस्था करणे, आपलं घर, आपलं गाव, आपलं शहर आधी स्वच्छ व्हावं. या दिशेने एक पाऊल उचललं तर नक्कीच या परिस्थितीचे एका सुंदर प्रतिमेत रूपांतर व्हायला वेळ लागणार नाही. सध्याचा श्रावण म्हणजे सणावारांचा, आनंदाचा, उत्साहाचा आणि याच वेळेला नेमकं प्रदूषणही मान वर करून डोकावत असतं. मग यावेळेला नेमकं करावं काय? तर अगदी सोपा आहे प्रदूषण होईल अशा गोष्टींना आळा घालायचा. मोठ्या आवाजात जी गाणे लावली जातात त्याऐवजी गोड संगीत गायले, हळू आवाजात गाणी लावली. तर नक्कीच ध्वनी प्रदूषण कमी होऊ शकते. उत्साहाच्या दिनी सजावट करण्यासाठी आपण निरनिराळ्या प्लास्टिकच्या वस्तू ज्या आकर्षक आणि टवटवीत वाटतात त्यांचा आपण वापर करतो. परंतु नेमक्या प्रकारे त्याच पर्यावरणासाठी घातक असतात. तर अशा वस्तू ऐवजी आपण झाडांच्या पानाफुलांचा वापर केला पाहिजे. विचारांची सुरक्षितला आपण अर्पन केली पाहिजे. गरजूंना मदत दिली पाहिजे, शिक्षण दिले पाहिजे, अन्न दिले पाहिजे. वाटेवरून चालताना प्रत्येक मुलगी ही सुरक्षित राहिल यांची हमी आपण घ्यायला हवी.

मादक विचारांना आळा घालून संस्कारीत विचारांची लागवड करायला हवी. यावेळेला स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना आपण "हर घर तिरंगा" ही मोहीम राबवत आहोत. खरं तर ही फार अभिमानास्पद गोष्ट आहे. याप्रकारे हा अमृत महोत्सव एका निराळ्या पद्धतीने साजरा होईल. पण हे करत असताना सुद्धा काही गोष्टींची काळजी घेणे फार गरजेचे आहे ज्या ठिकाणी आपल्याला राष्ट्रध्वज उभारायचा आहे. त्या ठिकाणची जागा आधी धुऊन स्वच्छ केलेली पाहिजे. रांगोळी काढून परिसर सुशोभित करावा. राष्ट्रध्वज योग्य पद्धतीने फडकविला गेला पाहिजे. कोणत्याही पद्धतीने राष्ट्रध्वजाचा अपमान होणार नाही. याची काळजी आपण घेतली पाहिजे तसेच राष्ट्रध्वज मळालेला, खराब, अस्वच्छ नसावा. तसेच राष्ट्रध्वजाचा केशरी रंग हा आकाशाच्या दिशेने असावा व हिरवा रंग हा जमिनीच्या दिशेने असावा. अशा योग्य पद्धतीनेच राष्ट्रध्वज फडकवावा. तसेच 15 ऑगस्ट नंतर याध्वजाची नेटकेपणाने घडी करून स्वच्छ जागी ठेवला गेला पाहिजे. कुठल्याही पद्धतीने त्याचा अपमान होणार नाही व अस्वच्छ होणार नाही इतरत्र टाकला जाणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घ्यायला हवी. आपल्या मुलांना आपण स्वातंत्र्याचा गोष्टी तर ऐकवतोच परंतु यावेळी त्याच्या मनात देशभक्ती आणि देशाविषयी असलेल्या जबाबदारीची जाणीवही करून दिली पाहिजे. आणि याच वेळेला आपल्या मनाशी एक संकल्पही करायला हवा. प्रत्येकाचा संकल्प हा निराळा असू शकतो; मात्र त्याचा उपयोग हा आपल्या पर्यावरणाच्या रक्षणासाठी तसेच देशाच्या आरोग्यासाठी व्हावा. ही गोष्ट आपण सर्वांनी स्मरणात ठेवायला हवी. या वेळी जितक्या अनोख्या पद्धतीने आपण स्वातंत्र्यदिन साजरा करणार आहोत तितक्याच निराळ्या पद्धतीने आपल्याला संकल्प करणे गरजेचे आहे आणि तो संकल्प आपण टिकवून ठेवणे देखील आवश्यक आहे. स्वातंत्र्याच्या या पावन दिनी नवे विचार, नवे संकल्प, नवे धोरण आपण अंगीकारू आपल्यातलं काहीतरी काढून आपण या देश सेवेसाठी देऊ तेव्हाच खऱ्या अर्थाने हा अमृत महोत्सव यशस्वी साजरा होईल. या स्वातंत्र्यदिनी भारतमातेला सलाम करताना एक विचार मनाशी घट्ट असावा. की मनावरची, विचारांची जुनाट बंधन आम्ही झुगारून आम्ही विचारांची विवेकी वाट नक्की शोधू... खऱ्या अर्थांने विचारी आणि स्वतंत्र होऊ... हा आपण सर्वांनी नक्की करा.

# जग विनाशाकडे जात आहे याला युवावर्गाने रोखले पाहिजे



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**जगातील संपूर्ण युवकांनी घातक हतीयार, जैविक हतीयार व वाढते प्रदुषण याचा कडाडून विरोध करण्याची वेळ आली आहे. संयुक्त राष्ट्र संघाने 17 डिसेंबर 1999 ला युवा विश्र्व संम्मेलनाच्या कार्यक्रमात ठरविण्यात आले की प्रत्येक वर्षाच्या "12 ऑगष्टला" युवा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. याप्रमाने पहिल्यांदाच 2000 मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिवसांची सुरूवात करण्यात आली. 2018 मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिवसांचा थीम होता "युवाओं के लिये सुरक्षित स्थान" आणि 2019 मध्ये थीम होता "ट्रांस्फोर्मिंग एज्युकेशन" परंतु 2022 चा थीम "युवाओका पृथ्वी को बचाने का प्रयास". हा थीम असायला पाहिजे असे माझे मत आहे. कारण वैश्विक महामारी आणि पृथ्वीचा होत असलेला ह्रार याला युवा शक्तीच वाचवु शकते.**

संपूर्ण जगाची धुरा युवकांच्या हाती आहे. कारण आजच्या परिस्थितीत पृथ्वीतलावर जगात युध्दजन्य परीस्थितीत दीसुन येते. आज प्रत्येक देश एकमेकावर वरचढ होण्याचा प्रयत्न करीत आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे युक्रेन -रशिया युद्ध व तैवान -चीन संघर्ष यात प्रगती तर नाहीच परंतु विनाश अटळ आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शि.जिंपिंग यांनी वुहानमध्ये कोरोणा व्हायरस तयार केला आणि याला संपूर्ण जगात पसरविण्याचे काम सुध्दा चीनने केले. यात लाखोंच्या संख्येने जिवीत हानी सुध्दा झाली व करोडोंच्या संख्येने संक्रमीत आहेत. अमेरीकेने दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी 6 ऑगस्ट 1945 साली सकाळी 8 वाजुन 15 मि. हिरोशिमा-नागासाकीवर परमाणु बॉम्ब टाकला होता याचे मुख्य कारण तानाशहा हिटलर यांची क्रूरता समाप्त करने होती. परंतु याचे प्रायचीत्य जापानला भोगावे लागले. यात लाखोंची जीवीत हानीसुध्दा झाली. दिनांक 6 ऑगस्टला या घटनेला 77 वर्षे पूर्ण झाली. परंतु चीनच्या विस्तारवादी नितीला रोखण्यासाठी अमेरीकेसह नाटोसेनेने चायना सी मध्ये चिनला घेरून ठेवले आहे.

सोबतच चीन तैवानला नेहमीच युध्दासाठी उकसवीण्याचे काम करीत असतो. परंतु आता जर युद्ध झाले तर "तिसरे महायुध्द" अटळ आहे. याला युवावर्गानी कोठेतरी रोखले पाहिजे. कारण चीनने सुपरपावर बनण्यासाठी संपूर्ण हद्द पार केलेल्या आहेत. जगातील कोणत्याही देशाचा युवक असो त्याने पशु-पक्षी व मनुष्य प्राणी यांना कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही अशा पध्दतीचे कार्य अंगीकारले पाहिजे. याकरीता चीनच्या युवकांनी शि.जिंनपिंग यांच्या विनाशकारी बायोवेपन्सचा कडाडून विरोध करून चांगला धडा शिकवला पाहिजे. आज संपूर्ण जगाची धुरा युवकांच्या हाती आहे.

मानवजातीचा पृथ्वीतलावर जन्म जगण्यासाठी व विकासासाठी झाला आहे. त्यामुळे आजच्या युवकांनी जगाला कोणत्याही परीस्थितीत विनाशापासुन रोखलेच पाहिजे. अन्यथा अनर्थ होऊ शकतो याला नाकारता येत नाही. जर्मनीचा तानाशहा हिटलर यांची कल्पना "विस्तारवादाची" होती परंतु त्याचे प्रायचित्य "हिरोशिमा-नागासाकीच्या"स्वरूपात "जापानला" भोगावे लागले. याची पुनरावृत्ती चीन व चीनच्या मित्रराष्ट्रामध्ये होवु शकते याला नाकारता येणार नाही. चीनचे राष्ट्राध्यक्ष शि.जिनपिंग त्याचे विस्तारवादाचे प्रायचीत्य चीनला व त्यांच्या मित्रराष्ट्रांना भोगावे लागेल. त्यामुळे जगातील युवकांनी या युध्दजन्य परीस्थितीला रोखण्यासाठी जागतिक पातळीवर आवाज उठवीण्याची गरज आहे. करोना काळाच्या कठीण प्रसंगाने युवकांच्या रोजगारावर मोठे संकटाचे बादल निर्माण झाले होते. यामुळे संपुर्ण जगात मंदीचा काळ ओढवला आहे, अनेकांची घरे उजाडली आहे. उपासमारी, भुकमारी, बेरोजगारी, महागाई अशा कठीण प्रसंगांना युवकांना व सर्वसामान्यांना तोंड द्यावे लागत आहे. आजचा युवावर्ग फीजीकली कमजोर असला तरी "बुध्दीच्या" बाबतीत तर्बेज आणि ताकदवर आहे. त्यामुळे आज कोणत्याही संकटाला सामोरे जाण्यासाठी बुध्दीचा योग्य वापर करण्याची वेळ युवकांवर आली आहे.कारण युवाशक्ती "भविष्याची धरोहर" आहे. याची जोपासना करण्याचे काम अनुभवी पीढीने युवकांना मदत करून केले पाहिजे. आज संपूर्ण जग कोव्हीड-19 मुळे व निसर्गाचा ह्रास होत असल्याने मानवजाती भयभीत आहे. त्याचप्रमाणे जगातील प्रत्येक देशांनी आपल्या वर्चस्वासाठी मोठ्या प्रमाणात दारुगोळा, घातक क्षेपणास्त्रे व परमानु बॉम्ब बनवीले आहे. म्हणजेच आज संपूर्ण पृथ्वी "बारुदच्या ढीगाऱ्यावर" बसली आहे. त्यामुळे प्रत्येक देश विनाशाकडे वाटचाल करतांना दिसत आहे. परंतु विध्वंसकारी व विनाशकारी प्रवृत्तीला युवावर्ग रोखु शकते.

प्रत्येक देशाच्या युवकांनी शांतीचा मार्ग स्वीकारण्याचे ठाणले तर प्रत्येक देशाचे राष्ट्राध्यक्ष व राजकीय पुढारी युवकांच्या मार्गाला चालना देवु शकते. आपण हिरोशिमा-नागासिकाचा विनाश पहाला, 4 ऑगष्ट 2020 ला "लेबनॉनची राजधानी बेरुत" त्यांची पुनरावृत्ती आपण पहाली हा धमाका हिरोशिमा-नागासिकापेक्षा भयानक असल्याचे सांगण्यात येते, युक्रेन -रशिया युध्दामुळे युक्रेन 100 वर्षे मागे गेला आहे, चीन-तैवानमध्ये युध्दाची ठीणगी केव्हाही उडु शकते. म्हणजेच कोणताही दारूगोळा असो त्याचा फक्त एकच मार्ग असतो तो म्हणजे "विनाश". त्यामुळे जागतिक विनाशाला युवकांनी कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवु शकतो याला नाकारता येत नाही.सध्याच्या परीस्थितीत युवा शक्ती ही "जगाची धरोहर" आहे. त्यामुळे सर्वांनीच युवकांना सहकार्य करून जी काही "चीनकडून विनाशाची वाटचाल" सुरू आहे तीलाही ताबडतोब रोखण्याची नीतांत गरज आहे. हे कार्य युवकांच्या शक्तीनेच सफल होवु शकते. युवावर्ग सर्वच क्षेत्रात आमूलाग्र प्रगती करीत आहे यात दुमत नाही. परंतु शि.जिनपिंग व उत्तर कोरियाचा तानाशहा कींग्म जॉन उन सारखे जगाला विनाशाकडे नेत आहे. यांच्यावर ब्रेक लावने अती आवश्यक आहे. संपूर्ण जगातील युवावर्ग, शिक्षणामध्ये व खेळांमध्ये अग्रेसर आहेत. भारतातील युवावर्ग राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय खेळांमध्ये अग्रगण्य भुमिका बजावुन देशाची मान उंचावून सन्मानजनक स्थितीमध्ये आहे. याचे संपूर्ण श्रेय युवकांना जाते. देशाचा युवा म्हणजे भारताची आन-बाण-शान आहे. आंतराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने युवकांनी वृक्ष लागवडीकडे लक्ष देवून जास्तीत जास्त वृक्ष लागवडीचा संकल्प केला पाहिजे. यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# "कुटुंब रंगलय काव्यात"ने गिनिज विक्रम घडविला, विसुभाऊ बापटांच्या सान्निध्यात मी आनंद मिळवला

आमच्या महाविद्यालयात नविन प्राचार्य डॉ. टि. एस. बिराजदार रुजू झाले होते. २००४/०५ साल असावं. माझे मित्र कवी प्रा. वा. ना. आंधळे यांनी मला "कुटुंब रंगलंय काव्यात" हा कार्यक्रम आपल्या महाविद्यालयात होतोय याची कल्पना दिली. आणि मी एकदम सुखावलो. या कार्यक्रमाचा लौकिक मी जाणून होता. प्राचार्य बिराजदार यांनी प्रा. सी. एस. पाटील, प्रा. ए. एम. पाटील यांच्या सहयोगाने हा योग जुळवून आणला याचं मला अप्रुपच वाटलं. एक नामी संधीच या निमित्ताने चालून आली होती. ठरल्यावेळी मी माझे सन्मित्र संजीवकुमार सोनवणेंसह कार्यक्रमाला पोहचलो. विसूभाऊ आगोदरच आले होते. बघताच त्यांच्यातील आनंदवृत्तीचं दर्शन झालं. झब्बा-पायजमा. त्यावर जाकीट असं हसमुख, साधं सुधं व्यक्तिमत्व, प्रसनचित्त व्यक्तिमत्व आणि रसाळ वाणीच्या विसूभाऊंना क्षणार्धात आम्हाला आपलंसं केलं. आम्ही कवी असल्याने ती तार सहज जुळली. गप्पा रंगल्या आणि कार्यक्रम सुरु झाला.

कविता म्हणजे काय ? हे सांगताना विसूभाऊंनी कवितेची व्याख्याच मांडली. उत्कृष्ट भावनांचा सर्वोत्कृष्ट आविष्कार, म्हणजे कविता. कवितेला भावना, उत्कटता आणि सौंदर्य या तीन गुणांनी नटवले, तर अस्सल कविता जन्माला येते, हे त्यांनी सोदाहरण पटवून दिले. कार्यक्रमातील कविता सादर करतानाचा, त्यांचा सहज वावर, उत्स्फूर्त सादरीकरण, कमालीचे पाठांतर आणि योग्य जागा घेऊन, कवितेतील मर्म उलगडून दाखवण्याचं कौशल्य अचंभित करणारे होते. यामुळे त्यांनी काही मिनिटातच, उपस्थित सर्व रसिकांची मने जिंकून घेतली. एकाहून एक सरस कविता सादर करताना, त्यांनी कविता कशी शिकवावी ? कवितेचे रसग्रहण कसं करावं ? कवितेतील व्याकरणांवर किती भर द्यावा ? कवितेचा आस्वाद कसा घ्यावा ? हे अनेक कवितांमधून चपखलपणे पटवून दिलं. मराठी कवितेचं महत्त्व रसिकांना पटवून दिलं. कविता तिच्या सर्व गुणांसह रसिकांपर्यंत पोहोचली, तर ती रसिकांच्या हृदयामध्ये आढळत स्थान निर्माण करते, हे त्यांनी प्रत्येकाच्या मनावर बिंबवलं. तीन तास कवितेचा आस्वाद घेताना, एक मिनिट ही रसिक कवितेपासून दूर राहू शकला नाही. हेच त्यांच्या कविता सादरीकरणाचे यश आहे. कार्यक्रम संपल्यावर विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी टाळ्या वाजवून सभागृह डोक्यावर घेतले. कार्यक्रम आटोपल्यावर प्राचार्यांच्या दालनात, आमचा वैयक्तिक परिचय करून देण्यात आला. तेव्हा, त्यांनी त्यांच्या कवितांच्या डायरीमध्ये, आमच्या तिघांच्या कविता नोंदवून घेतल्या. कवितेची पारख असणाऱ्या, गुणग्राहक आणि काव्यपारखी माणसाकडे, आमच्या कविता संग्रहित झाल्या. याचा आनंद शब्दात न मावणारा होता. भविष्यात आमच्या कविता, कार्यक्रमात सादर करेल असा शब्द त्यांनी दिला होता. एखाद्या कुशल सोनाराकडे, सोनं गदिल्यानंतर तो त्याचा कलाकुसरीचा वापर करून, जो दागिना घडवतो तो देखणा होतो. तो येणाऱ्या प्रत्येक रसिकाला मोहून टाकत असतो. तीच कलाकुसर विसूभाऊंनी आमच्या कवितांना केली होती. पुढे माझी "जीवनाच्या संध्याकाळी" ही कविता, त्यांनी आपल्या कार्यक्रमात सादर केली, असं पुण्याच्या माझ्या एका मित्राने मला कळविलं, तेव्हा मला आकाश फक्त दोन बोट उरलं होतं. काव्य-जोहरीने माझ्या कवितेचा दागिना, रसिकांपुढे सादर करुन, माझ्या कविता लेखनाचं सोनं केलं होतं. मला एक अनोखी भेटच दिली होती. मी कृतकृत्य झालो होतो.

विसुभाऊ बापट यांचा जन्म सांगलीत झाला असला, तरी ते मूळचे गणपतीपुळ्याचे. त्यांचं शिक्षण हे कोल्हापूरात झालं. बालपणापासून आई-वडिलांनी लावलेल्या, पाढा-परवचा-स्तोत्र पठनाच्या गोडीतून त्याना कवितेचं वेड लागलं. वयाच्या ६ व्या वर्षीच त्यांनी सुप्रसिद्ध कीर्तनकार गणेश वाडेकर काणेबुवा यांच्या कीर्तनात, "माती सांगे कुंभाराला" ही पहिली कविता खणखणीत आवाजात पाठ म्हणून दाखवली. हा क्षण त्यांच्या मनात, कवितेबद्दलची प्रीती पेरून गेला. पुढे अर्थशास्त्रात एम. ए. झाल्यावर, त्यांनी काही काळ प्राध्यापकी केली. नंतर कोल्हापूर येथील सत्यवादी या दैनिकात सहसंपादक म्हणून काम केले. याच काळात शाळा शाळांमधून भेटी देत असताना, त्यांना शिक्षकांची कवितेबद्दलची अनास्था दिसून आली. यातून प्रेरणा घेऊन, विद्यार्थ्यांपर्यंत सकस, दर्जेदार कविता कशी पोहोचवता येईल, या विचाराने त्यांनी कवितेचा एक कार्यक्रम तयार केला. १९७६ साली राजाराम हायस्कूलमध्ये त्याचा प्रथम प्रयोग करून, त्यांनी कवितेची व्याख्या सांगून, तिचे स्वरूप स्पष्ट करताना, कविता व्याकरणासह कशी सादर करावी, हे विद्यार्थी शिक्षकांना पटवून दिले. येथेच त्यांच्या भावी एकपात्री कार्यक्रमाचे बीज रोवले गेले. बघता बघता हा कार्यक्रम शालेय स्तरावर प्रचंड यशस्वी झाला. पुढे २९ जानेवारी १९८१ रोजी त्यांनी अहमदनगर क्लब येथे "कुटुंब ऐकतंय काव्याला" हा प्रौढ रसिकांसाठी पहिला कवितेचा कार्यक्रम सादर केला. फक्त कवितेला वाहिलेला एकपात्री प्रयोग आपण सादर करावा, हे विसूभाऊंच्या मनात आले, तेव्हा त्यांनी सदानंद जोशी यांच्या "मी अत्रे बोलतोय" आणि लक्ष्मण देशपांडे यांच्या "वऱ्हाड निघालय लंडनला" या एकपात्री प्रयोगांना आपला आदर्श बनवले होते. या वाटेवर चालताना त्यांनी लोकप्रियता तर मिळवलीच, सोबत शताब्दी देखील गाठली. पुढे नाशिक येथील १०० व्या प्रयोगाला, "कुटुंब रंगलय काव्यात" या नावाने सुप्रसिद्ध झाला. या प्रयोगाने आजवर अनेक विक्रम प्रस्थापित केले असून, त्याचे तीन हजारावर कार्यक्रम झालेले आहेत. लिमका बुक ऑफ रेकॉर्डचा विक्रम करताना, सलग अकरा तास कवितेचे गायन विसूभाऊंनी केले. या पुढची पायरी गाठतांना त्यांनी, २७ सप्टेंबर २००९ रोजी, पंधरा तासाचा सलग कविता गायनाचा कार्यक्रम करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये आपलं नाव नोंदवलं. महाराष्ट्रातील असंख्य कवींच्या, हजारो कविता, कवींच्या हस्ताक्षरातील मूळ कविता, त्यांच्या संग्रही आहेत. यातील बहुसंख्य कविता त्यांच्या मुखोद्गत आहेत. कार्यक्रम सादर करताना ते कोणत्याही कवितेची पुनरावृत्ती करत नाहीत. इतकी त्यांची या कार्यक्रमावर पकड बसली आहे.

विसूभाऊ बापट यांच्या संग्रही ग दि माडगूळकर, कुसुमाग्रज, विठ्ठल वाघ, वसंत बापट, भाऊसाहेब पाटणकर, जगदीश खेबुडकर, गोविंद आफळे, प्रभाकर पणशीकर, वामनदादा कर्डक, यासारख्या अनेक दिग्गजांच्या स्वस्ताक्षरातील कविता आहेत. विठ्ठल वाघ तर त्यांना मराठी कवी आणि कवितेचे भाट म्हणत असत. ज्याचा विसूभाऊंना सार्थ अभिमान वाटायचा. संग्रही कवितांपैकी, बहुतांशी कविता या अप्रकाशित असून, त्या केवळ विसूभाऊंच्या प्रेमाखातर कवींनी लिहून दिलेल्या आहेत. कार्यक्रमाच्या निमित्ताने ते संपूर्ण महाराष्ट्रभर फिरतात. तेव्हा प्रत्येक गावातील कवींच्या कविता, ते आपल्या नोंदवहीमध्ये नोंदवून घेतात. आजपर्यंत त्यांच्याकडे अशा ४५ वह्या कवितांनी पूर्ण भरलेल्या आहेत. प्रत्येक वहीत सरासरी २०० कविता धरल्या, तरी हा संग्रह नऊ हजार कवितांचा असू शकतो. जो काव्य रसिकांसाठी काव्यरत्नांचा एक अलौकीक खजिनाच आहे.

स्वतः कवी नसूनही, केवळ कवितेवरील प्रेमापोटी, इतर कवींच्या कविता संग्रहित करणारे, त्यांच्यावर प्रेम करणारे आणि त्यांना हजारो रसिकांपर्यंत पोचवणारे, विसूभाऊ हे महाराष्ट्रातील एकमेव अवलिया कलाकार आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी ते "ओंकार काव्य दर्शन" नावाचा कार्यक्रम सादर करतात. हा कार्यक्रम त्यांनी आतापर्यंत १४ हजार शाळांमधून सादर केला आहे. केवळ बहिणाबाईंच्या कवितांना समर्पित असलेला, "बहिणाबाईंच्या- कविता" हा कार्यक्रम ते सलग दोन तास सादर करतात. वऱ्हाडी कवितांना वाहिलेला "हुरडा पार्टी" नावाचा काव्य गायनाचा कार्यक्रम ते तीन तास करू शकतात. "कुटुंब रंगले काव्यात" हा कार्यक्रम सलग ४५ तास करण्याचा त्यांचा मानस असून, कविता सादरीकरणाचा हा न भूतो न भविष्यती असा वैश्विक उपक्रम ठरू शकेल.

विसूभाऊ बापटांचा "कुटुंब रंगलय काव्यात" हा कार्यक्रम आजही प्रचंड लोकप्रिय आहे. सामाजिक माध्यमांचे आक्रमण वाढलेले असतानाही रसिक या कार्यक्रमाला गर्दी करतात. यावरूनच या कार्यक्रमाचा दर्जा आपल्याला समजतो. आपल्या कार्यक्रमाला येणारा रसिक, हा सहकुटुंब येतो. म्हणून, विसूभाऊंनी कार्यक्रमात बालक, युवकांसाठी, जेष्ठांसाठी, महिला आणि पुरुषांसाठी सुद्धा कवितांचे नियोजन केलेले असते. विसूभाऊ कविता सादर करताना, कवितेतील प्रत्येक प्रकाराला स्पर्श करतात. ज्यात बडबड गीत, बालगीत, अभंग, भक्तीगीत, आरत्या, भावगीत, नाट्यगीत, स्फूर्तीगीत, कूट कविता, स्फूट कविता, आरत्या, चित्रपट गाणी, आर्या, लोकगीते, वात्रटिका, गझल, शेरोशायरी, कणिका, लावणी, सवालजवाब, पोवाडा, पटका, हजल, दोहे, हायकू, रुबाई या सर्वांचा समावेश असतो. यामुळे कार्यक्रमाला येणारा प्रत्येक स्तरावरचा रसिक, कवितेचा आस्वाद घेऊ शकतो. कवितेच्या प्रेमात पडतो. त्यांच्या कार्यक्रमात ज्या कविता रसिकांना भावतात किंवा वन्स मोर घेतात त्यात, ग.दि.मांडगुळकरांच्या एक धागा सुखाचा, अजब तुझे सरकार आणि नदी सागरास मिळते, जगदीश खेबुडकर यांची आकाशी झेप घे रे पाखरा, दादा कोंडके यांचे अंजनीच्या सुता, वामनदादा कर्डकांचं आमचा वाटा कुठे आहे हो, रत्नपारखी यांची शेपटा, मोदा देशमुखांचं उलन खिचडी साजुक तूप, गोविंद आफळेंचं रखुमाई रुसली, विठ्ठल वाघांचं काळ्या मातीत मातीत आणि वि. वा. शिरवाडकर यांचे ओळखलेत का सर मला ? या कविता चा समावेश होतो. ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. रसिकांकडून यांची विचारणा होते. हे मराठी कवितेची शक्ती आणि यश आहे, असं ते म्हणतात. कविता ही उत्स्फूर्त येणारं सृजन आहे. कविता स्फूरणं आणि कविता पाडणं हे दोन वेगवेगळे प्रकार आहेत. आपल्याला उत्स्फूर्त कविता स्फूरली नाही आणि आपण बळजबरीने कविता पाडलीही नाही. मात्र, समृध्द कवितेवर मनापासून प्रेम केलं असं म्हणणारा विसूभाऊ हा कवितेचा अस्सल रसिक आहे. रत्नपारखी आहे. केवळ दर्जेदार कवितेचा प्रसार व्हावा, यासाठी आपलं संपूर्ण आयुष्य पणाला लावणारा हा काव्यरत्नाकर माझ्या गावाला आला. मी त्यांना ऐकू शकलो. त्यांच्याशी संवाद साधू शकलो. ही माझ्या आयुष्यातली एक मोठी गोष्ट आहे असं मी मानतो. त्यांच्या संग्रही असलेल्या ४५ वह्यांच्या काव्य खजिन्यात माझेही दोन काव्यरत्न आहेत, हीच माझी श्रीमंती. तो क्षण मी आठवतो तेव्हा मलाच माझा हेवा वाटायला लागतो. विज्ञानाचा विद्यार्थी ते विज्ञान शिक्षक हा प्रवास करतांना, मी कधी काव्य वाट चालू लागलो ते मलाच कळलं नाही. या वाटेवर चालतांना हा काव्यप्रेमी भेटला. त्या भेटीला अत्तर क्षणांचं मोल आलं. आज या भेटील २५ वर्षे झालीत. मात्र, तिचा तो अविट सुगंध मला आजही आजपास जाणवतो. मला मंत्रमुग्ध करुन टाकतो. विसूभाऊंसारखी माणसं रसिकांना कवितेचा आस्वादक बनवतात. कवीला समृध्द होण्याची वाट दाखवतात.

आधुनिक केसरी




स्वतः एकही कविता लिहलेली नसतांना, मराठी कवितेवर भाष्य करणाऱ्या "कुटुंब रंगलंय काव्यात" या कार्यक्रमाचे ३ हजारावर प्रयोग करणारे विसूभाऊ बापट म्हणजे कवितेचा खरा रत्नपारखी आहे. मराठीतील दिग्गज कवींपासून ते आजच्या नवोदीत कवींपर्यतच्या हजारो कवींच्या, ९ हजारावर कविता त्यांच्या संग्रही आहेत. कवितांनी भरलेल्या ४५ वह्या, म्हणजे त्यांनी जमवलेली अनमोल संपत्ती आहे. कविता सादरीकरणाचा, "लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड" आणि "गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड" मध्ये आपले कोरणारे विसूभाऊ, मराठी कवितेला दर्जा आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी अहोरात्र झटत आहेत. प्रस्थापित कवींची अपरिचित कविता आणि नवोदित कवीची अप्रतिम कविता ते मराठी रसिकांपर्यंत पोहचवित आहेत. कवितेला आपला श्वास मानणारे विसूभाऊ समाजाला चांगली कविता ऐकण्याची सवय लावत आहेत. त्यासाठी लागणारी जाण निर्माण करीत आहेत आणि कवींना चांगली कविता लिहिण्याचं भान देत आहेत. आपल्या आयुष्यातील ४० वर्षे कवितेला देणारा हा, जगावेगळा काव्य कुबेर मला भेटायला आज २० वर्षे होत आहेत. आमच्या महाविद्यालयात त्यांनी सादर केलेल्या कार्यक्रमात, मी खऱ्या अर्थाने मराठी कवितेचा आस्वाद घ्यायला शिकलो. मी कविता लिहतो हे ऐकल्यावर त्यांनी आपली बॅग उघडली. एक वही काढत माझ्या हातात दिली. आणि, तुम्हाला आवडतील अश्या तुमच्या दोन कविता यात लिहून द्या, अशी विनंती केली. कुबेराने गंगूतेल्याकडे दान मागावं, तशी माझी गत झाली. मी माझ्या दोन कविता, त्या वहित उतरवल्या. माझं अक्षर आणि कविता वाचून, विसूभाऊ खुष झाले. त्यांनी कौतुकाने पाठ थोपटली. आणि, मी धन्य झालो. तो क्षण माझ्या जीवनातला अत्तर क्षण झाला. माझं जगणं सुगंधीत करुन गेला.



विश्वविक्रमी "कुटुंब रंगलय काव्यात" चे निर्माता काव्य-कुबेर प्रा. विसूभाऊ बापट यांच्या सोबत प्रा.बी.एन.चौधरी.

# शारीरिक शिक्षणामुळे क्रीडा क्षेत्राचा पाया मजबूत होईल



भरत कोळी
बॉक्सिंग प्रशिक्षक, धुळे

आधुनिक केसरी

**धुळे -महासत्तेच्या दिशेने जातांना विविध क्षेत्रात आपण जगावर वर्चस्व प्रस्थापित करणं हे विविध देशांची आर्थिक, राजकीय, सामाजिक, क्रीडा व इतर क्षेत्रातील स्थिती पाहता भारतानं २१ व्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मजबूत होणं आवश्यक आहे. कारण देशाची अर्थव्यवस्था, सामाजिक व्यवस्था, राजकीयदृष्ट्या देशहिताची भूमिका, नैसर्गिक साधनसंपत्ती, क्रीडा क्षेत्रातील प्रगती आणि देशातील नागरिकांची आरोग्य बाबतीत असलेली सुदृढता व त्यांची कौशल्य सक्षमता यावरचं खऱ्या अर्थाने देशाच्या महासत्तेचे महाभवितव्य अवलंबून आहे आणि महासत्तेची संकल्पना ही तळागळापर्यंत रुजली पाहिजे असं मला वाटतं असो पण "क्रीडा क्षेत्राच्या बाबतींत ही भारतानं इतर देशांच्या तुलनेत अधिक मजबूत होणं गरजेचं आहे."**

यासाठी शालेय स्तरावरील शारीरिक शिक्षण विषयाला मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोणाने अधिक प्राधान्यता देऊन त्यांच्या मुलभूत कारक हालचालींचा विकास, मूलभूत क्रीडा कौशल्याचा विकास करून त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिकतेच्या बाबतींत सक्षम करणं हे क्रीडा क्षेत्राच्या आधुनिकरणाला अधिक चालना देऊ शकेल. याध्येयवादी दुष्टीने शारीरिक शिक्षणाला शालेय स्तरावर अधिक सक्रिय करुन क्रीडा क्षेत्राचा पाया मजबूत करावा, खरंतर शारीरिक शिक्षण व क्रीडा ह्या नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि या दोन्ही बाजू एकमेकांवर अवलंबून आहे.

एका बाजूला अधिक पाठबळ आणि दुसऱ्या बाजूला सतत केलेलं दुर्लक्ष याने पाहिजे तसं यश संपादन होत नाही हे लक्षात घ्यावं, नुकत्याचं इंग्लंड (बर्मीहिर्घम) येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताने २२ सुवर्ण, १६ रौप्य, २३ कांस्य असे ६१ पदके घेऊन संपुर्ण स्पर्धेत अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली त्याबद्दल सर्व खेळाडू, मार्गदर्शक, प्रशिक्षक व समस्त भारतीय क्रीडा क्षेत्राचे मनःपुर्वक अभिनंदन जर आणखीचं शूटिंग या खेळाचा समावेश राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत समावेश राहिला असता तर अधिक पदके मिळाली असती मागच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताला शूटिंगमध्ये एकूण १६ पदके होती असो पण २०२२ मध्ये झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची कामगिरी ही भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद आहे यात शंका नाही पण देशांची नैसर्गिक गुणवत्ता ही शालेय स्तरावरचं अधिक सक्रिय व्हावी जेणेकरुन आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा खेळाडू अधिक कौशल्य मजबूतीने खेळत पदकांची लयलूट करू शकेल पण त्यासाठी शालेय स्तरावरील शारीरिक शिक्षणाचा पाया मजबूत असणं आवश्यक आहे. खेळाडूंची क्रीडा कामगिरी उंचावण्यासाठी "थेंबे थेंबे तळे साचे" या सूत्राने जात शालेय स्तरावर त्यांच्या मूलभूत हालचालींचा, क्रीडा कौशल्याचा, खेळाडूवृत्तीचा, मानसिक, भावनिक व सामाजिक क्षमतेचा विकास होणं हे अतिशय गरजेचं असतं म्हणून शारीरिक शिक्षणाला प्रथम प्राधान्य देऊन शालेय स्तरावरचं खेळाडूंचा सर्वांगीण विकास करावा असं मला वाटतं आणि शारीरिक शिक्षणचं क्रीडा क्षेत्राचा मूलभूत पाया आहे हे प्रत्येकाने लक्षात घेत शालेय स्तरावरील शारीरिक शिक्षणाकडे दुर्लक्ष न करता शारीरिक शिक्षणातून क्रीडा क्षेत्राचा विकास कसा साधला जाईल यासाठी प्रयत्नशील असावे.

त्याचबरोबर आपण शालेय स्तरावरील मुलांकडून भरपुर अशा अपेक्षा न करता (खास करुन पदकांच्या) त्यांच्या कौशल्यात व कामगिरीत कशा सुधारणा होतील याकडे अधिक लक्ष द्यावे व त्यांच्याही लक्षात आणावे, अशा विविध प्रकारच्या समस्यांचे निवारण हे उपक्रमशील व सक्रिय राबविलेल्या शारीरिक शिक्षणातून होत असते, खरंतर शारीरिक शिक्षणातूनचं खेळाची मूल्ये ही मुलांमध्ये शालेय स्तरावर रुजवली जात असतात म्हणून शारीरिक शिक्षणाकडे दुर्लक्ष न करता शाळेच्या मैदानावर शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग हा शारीरिक शिक्षणाच्या तासात/शारीरिक उपक्रमात नोंदवला गेला पाहिजे जेणेकरून विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास होत ते खेळात आपली यशस्वी भूमिका बजावतील अशा अनेक बाबी आहेत ज्या शारीरिक शिक्षणातून साध्य होत असतात म्हणून आज क्रीडा क्षेत्राचा पाया मजबूत करण्यासाठी शालेय स्तरावर शारीरिक शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करावी.

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना...



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून 75 वर्षे पूर्ण झाले आहेत आणि आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. अमृत महोत्सव साजरा करीत असताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात घ्यावी लागेल की आपली स्वातंत्र्या नंतरची कोणती स्वप्न होती आणि अपेक्षा होत्या प्रत्यक्षात त्या पूर्ण झाल्या आहेत का ? त्यात काय उणीवा आहेत, कमतरता आहे आणि आता येणाऱ्या काळात आपल्याला कशाप्रकारे पावले उचलावी लागतील याचा विचार करणे महत्त्वाचा आहे. थोडक्यात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना आपण काय कमावले आहे आणि काय गमावले आहे हे पाहणे सुद्धा महत्त्वाचे आहे. गेल्या 75 वर्षात अनेक गोष्टी घडलेल्या आहेत. प्रगती झाली आहे, असे असले तरी अजून खूप मोठा टप्पा बाकी आहे असे म्हटले तरी चालेल. शिक्षण क्षेत्र, विज्ञान, क्रीडा, शेती, संशोधन, उद्योगधंदे, औद्योगिक क्षेत्रात बरीच भरीव कामगिरी झालेली आहे. साहित्य आणि कलाक्षेत्रातही प्रगतीचा टप्पा गाठला आहे. तरीपण अजूनही शिक्षण क्षेत्र, शेतकरी शेती क्षेत्र, बैरोजगारीचा प्रश्न, भ्रष्टाचार, पर्यटन, पर्यावरण, क्षेत्रात खूप काही करायचे आहे.**

आपल्याला स्वातंत्र्य मिळाले यासाठी ज्यांनी आवाज उठवला ते भगतसिंग, राजगुरू, चंद्रशेखर आजाद, मंगल पांडे, सुभाष चंद्र बोस, लाला लजपतराय, झाशीची राणी लक्ष्मीबाई, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, आणि असंख्य ज्ञात अज्ञात क्रांतिकारक ज्यांनी ज्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली, प्राणाचे बलिदान दिले आजही जवान देशाच्या सीमेवर देशाचे संरक्षणासाठी शहीद झाले आहे. आज आपण हा अमृत महोत्सव साजरा करत आहोत आणि या सगळ्यांना वंदन करणे हे आपल्या सगळ्यांचे कर्तव्य आहे. आणि म्हणूनच "घर घर तिरंगा"..."हर घर तिरंगा" ....हा उपक्रम राबवून आपण त्यांना वंदन करणार आहोत त्यांच्या स्मृती जागवणार आहोत. प्रत्येकाचा यात सहभाग अत्यावश्यक आहे.

शिक्षणाचा विस्तार जरी झाला असला तरी अजून खूप खेडे पाडे, तांडे वस्ती असे आहेत की तिथपर्यंत शिक्षणासाठी च्या सुविधा पोहोचल्या नाहीत. मुलं शिक्षण घ्यायला तयार आहेत पण शाळेपर्यंत जाण्याची योग्य अशी व्यवस्था नाही. दळणवळणाचे साधन नाही. अतिशय बिकट परिस्थितीत त्यांना पावसाळ्यात, उन्हाळ्यात, शाळेत पोहोचावे लागते. बेरोजगारीचा प्रश्न तो सुद्धा पूर्णपणे सुटलेला नाही. कोटीच्या संख्येने बेरोजगारी आहे. शिक्षण घेतलेल्यांना सुद्धा वेळेवर नोकरी मिळत नाही. बालमजूरीचा प्रश्नही आहे. त्यामुळे शिक्षण सोडावे लागते.

भ्रष्टाचार हा तर कायमस्वरूपी प्रश्न आहे अजूनही पूर्णपणे भ्रष्टाचार निर्मूलन झालेले नाही. शासन आणि प्रशासन दोघेही आज भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत. राजकीय नेत्यांच्या भ्रष्टाचाराच्या अनुकरणाने प्रशासकीय अधिकारी आता भ्रष्टाचारात सामील होताना दिसत आहेत. अनेक राजकीय नेते तुरुंगात आहेत. काही जाऊन जामीनावर सुटून येतात आणि परत मोठ्या दिमाखाने राजकारणात स्थान मिळवतात. परत मंत्रिपदाची शपथ घेतात कोणी बँकेचे अध्यक्ष होतात.तर कोणी साखर कारखान्याचे अध्यक्ष होतात. राजकीय स्वार्थापोटी त्यांच्या भ्रष्टाचाराकडे डोळेझाक केली जाते. अशा लोकांना स्थान देणे म्हणजे परत भ्रष्टाचाराला आमंत्रणच आहे.

आता तत्त्वासाठीचे राजकारण संपलेले असून फक्त सत्तेसाठी राजकारण असे समीकरण झालेले आहे.एकवेळ एकमेकांबद्दल अर्वाच्य बोलणारे मांडीला मांडी लावून बसतात. पक्षा पक्षांमध्ये अतिशय सुडाचे राजकारण सुरू आहे. एकमेका विषयीची आस्था राहिलेली नाही, फक्त एकमेकाला संपवण्याची भाषा मात्र केली जाते. 75 वर्षात या गोष्टीत अतिशय बदल होणे आवश्यक होते परंतु आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना आपली तत्व आणि पाळायची पथ्य याचा मात्र विसर पडलेला आहे. बोलताना सुसंस्कृत पणा जाणवत नाही.. पातळी सोडून बोलणे होते. वयाचे भान नाही आणि पदाची जाण नाही अशी काहीतरी अवस्था झालेली आहे असे खेदाने म्हणावे लागते.

स्वच्छ भारत योजना काही काळापुरती प्रभावीपणे राबविली गेली पण काही काळाने त्यातही अनुत्साही वातावरण आले. त्याला कारण म्हणजे शासन प्रशासनातील उदासीनता आणि लोकांचा पाहिजे तसा सहभाग नसणे.

पर्यावरणासाठी संवर्धनासाठी खूप सारे प्रयत्न केले जातात परंतु जोपर्यंत सगळ्यांचा सहभाग त्या त्या प्रमाणात मिळत नाही तोपर्यंत तेही शक्य नाही. वृक्ष लागवडीमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला भ्रष्टाचार वेळोवेळी आपण वृत्तपत्रातून आणि दूरचित्रवाणीवरून वाचला आहे, बघितला आहे. सुशोभीकरणाच्या नावाखाली शंभर ते दीडशे वर्ष जुनी वृक्ष तोडले जातात या गोष्टीकडे डोळे झाक केली जाते. त्याचबरोबर प्रदूषणाचा ही प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहे. अजूनही पहिजे त्या प्रमाणात प्रदूषण नियंत्रण झालेले नाही. पाहिजे तशी कडक भूमिका घेऊन कामकाज होत नाही. भारताला समृद्ध असा समुद्रकिनारा आणि निसर्गाची देणगी लाभलेली आहे. त्यामुळे तसेच अनेक धार्मिक स्थळे आणि पर्यटन करण्यायोग्य अगदी जागतिक कीर्तीची ठिकाण असूनही पाहिजे त्या प्रमाणात पर्यटन विकास झालेला नाही.

शेती हा तर भारतात प्रमुख व्यवसाय आहे परंतु आज 75 वर्षे उलटून गेल्यावरही शेतकऱ्याची परिस्थिती मात्र बदललेली नाही. पूर्वीच्या समस्या कायम आहेत त्यात अजूनही भर पडली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहे. शेती धोरणात अमुलाग्र बदल होणे आवश्यक आहे. कारण आपल्या देशात जवळपास 70 ते 75 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळत नाही परंतु तोच माल बाजारपेठेत मोठ्या प्रमाणातन नफा घेऊन विकला जातो. हमीभावाचा प्रश्न सोडवला जात नाही. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणतात अमेरिकेत एका एकरात तीस क्विंटल सोयाबीन होतं आणि आपल्या देशात मात्र चार क्विंटलच्या वर जात नाही मग कृषी विद्यापीठाचा फायदा काय ? आणि खरंच जर कृषी विद्यापीठातील संशोधनाचा फायदा सर्वसाधारण शेतकऱ्याला मिळत नसेल तर तो कसा मिळेल आणि त्याचे उत्पादनात वाढ कशी होईल हे पाहणे महत्त्वाचे आहे.

स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण कमी होत नाहीत. शक्ती सारखा कायदा संमत केला जातो. कायदे पुष्कळ केले जातात, परंतु त्याची अंमलबजावणी होणे महत्त्वाचे असते. नाहीतर त्या कायद्याचे काही महत्त्व राहत नाही आणि ते कुचकामी ठरतात. ग्रामपंचायत, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, आदी ठिकाणी स्त्रियांसाठी राखीव जागा असतात त्या ठिकाणी स्त्रियांना डावलून त्यांचे पतीच कामकाज करत असतात. त्यांना निर्णय स्वातंत्र्य नसते. केवळ पद आपल्या घरात राहावे ही एक व्यवस्था असते. विधानपरिषद, विधानसभा, या ठिकाणी सुद्धा स्त्रियांना नगण्य स्थान असते फार कमी स्त्रियांचा मंत्रिमंडळात समावेश केला जातो. गेल्या काही दिवसापासून सोशल




मीडियावर एक व्हिडिओ दाखवला जात आहे. त्यातील दृश्य पाहून खरोखरच पाहणाऱ्याचे मन विचलित झाल्याशिवाय राहत नाही. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही आपल्या देशात इतक्या सोयी सुविधा होऊ नये, असे काही भाग दुर्लक्षित राहिलेले आहेत की जिथे मुलांमध्ये शिकण्याची प्रचंड ईच्छा आहे परंतु त्यांना कुठल्या परिस्थितीचा सामना करावा लागतो ? दरवर्षी पावसाळ्यात त्यांना अक्षरशः पातेल्यात बसून दोन दोन विद्यार्थ्यांना नदीपार करून दुसऱ्या तिरावर पोहोचले जाते. तसेच काहींना खांद्यावर घेऊन पोहोचले जाते परत आणले जाते.. त्यातील दृश्य जे आहेत नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील देवळाचा पाडा इथले आहे. या नासिक भागात विधानपरिषद आणि विधानसभा मिळून 18 आमदार आहेत आणि तसेच तीन खासदार आहेत एक केंद्रात मंत्री आहे, तरी इथल्या अशा भागात काय परिस्थिती आहे हे समोर येते. खरच हा एक नमुना आहे. असे महाराष्ट्रात अनेक जिल्हे आणि देशात अनेक भाग असतील आणि तिथे अशी परिस्थिती असेल. आज हे आपल्याला समोर आले म्हणून दिसले. शासन प्रशासन शिक्षण विभाग झोपला आहे काय? असा साहजिकच प्रश्न निर्माण होतो. अमरावती.. परतवाडा, मेळघाट, नंदुरबार, जळगांव, मराठवाडा, विदर्भातील दुर्गम भागात दळवळण आणि मूलभूत सुविधा अभाव तसेच शिक्षकांची अनास्था शाळेवर शिक्षक हजर नसल्याने शाळेला कुलूप लावावे लागते अर्थातच स्थानिक लोकप्रतिनिचे दुर्लक्ष या गोष्टी प्रामुख्याने याला कारणीभूत आहेत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना अजून एक गोष्ट काही दिवसांपूर्वी वाचण्यात आली. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ करणारी मुलींची पहिली शाळा म्हणजे पुणे येथील भिडेवाडा, अत्यंत बिकट परिस्थितीत असून सध्या या वाड्यात खोल्या मध्ये देशी-विदेशी दारूच्या बाटल्या, सिगरेटचे थोडके, असा प्रकार दिसून आला. केवळ महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जयंती पुण्यतिला त्यांच्या प्रतिभेला हार अर्पण केला जातो इतर दिवस मात्र कोणी नसतं. मुलींची ही स्त्री शिक्षणाची क्रांती करणारी पहिली शाळा दारूचा अड्डा बनला आहे अशी माहिती समोर आली आहे. ही खरोखरच अतिशय शरमेची बाब आहे.

एकीकडे शहरामध्ये झगमगाट आहे नागपूर- पुणे- मुंबई मेट्रो रेल्वे, मुंबई- गुजरात बुलेट ट्रेन, मोठे मोठे प्रकल्प उद्योगधंदे सुरू होत आहेत. मोठे मोठे रस्ते, खाजगी शाळांना परवानगी मिळते आणि सरकारी शाळा ओस पडत आहेत. 75 वर्षात आपण सरकारी शाळांना विकसित करू शकलो नाही. हे अपयशच आहे. त्यामुळे नकळत पालकांचा ओघ खाजगी शाळांकडे वाढला असच म्हटलं पाहिजे. शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. शेतकऱ्यांच्या समस्या सुटत नाही त्यामुळे आत्महत्या वाढत आहेत शिक्षित तरुण आहे तोही नोकरी धंद्याच्या शोधात आहे बेरोजगारी वाढत आहे. जिल्हा बँका एसटी महामंडळ वीज महामंडळ यांच्या पेन्शन धारकांना अत्यंत अल्प पेन्शन मिळते, ते वाढवून मिळण्यासाठी लढा दोन वर्षापासून सुरू आहे. त्यांचेही मागण्या पूर्ण झालेल्या नाही. त्याच्या मागण्याकडे दुर्लक्ष होत आहे. सरकार बदलले, मंत्री बदलले की त्यांच्या बंगल्याच्या दुरुस्तीसाठी, रंगरंगोटीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. सर्वसामान्य माणूस महागाईच्या वणव्यात पोळतोय. गॅस, पेट्रोल, डिझेल, भाजीपाला, अन्नधान्य, सर्वच महागले आहे. अनेक वस्तूवर कराचा बोजा लावला गेला आहे. आमदार खासदार म्हणून निवृत्त झालेल्यांना पेन्शन दिले जाते. वेळोवेळी त्यात वाढ केली जाते. वास्तविक लोकप्रतिनिधी हा काही व्यवसाय नाही. तेव्हा आमदार खासदार यांचे पेन्शन आता स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना बंद करण्याचा धाडसी निर्णय घेण्यात यावा. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी "भारत विरुद्ध इंडिया" अशी मांडणी केली होती. गेल्या काही वर्षात ठराविक शहरांचा विकास झाला आणि विकासाचा झगमगाट काही ठराविक शहरांमध्ये झाला तो विकसित भाग म्हणजे इंडिया, आणि ग्रामीण भाग या विकासापासून वंचित राहिला विकासाचा उजेड तिथपर्यंत पोहोचलाच नाही आणि त्यामुळे तो भाग अंधारात चाचपडतोय, तो भाग म्हणजे भारत.

आता आपल्याला शेती अशी करायची आहे की प्रथम क्रमांक शेती राहिली पाहिजे, द्वितीय क्रमांकावर व्यवसाय, तिसऱ्या क्रमांकावर नोकरी आली पाहिजे, असे फार मोठे विधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे, खरंच असे जर झाले तर ? स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना या गोष्टी विचारात घेतल्या तर त्या खूप महत्त्वाचे ठरतील यात शंका नाही. या विधानाची सत्यता प्रत्यक्षात यावी ही अपेक्षा या निमित्ताने करूया.!!

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या उंबरठ्यावरील भारताची ज्वलंत वास्तविकता



प्रा. प्रशांत खामकर
संपर्क क्र. 9970423204

आधुनिक केसरी

**"७५ साल हुए आजादी को, चलो आज फिर एकता दिखाते है; मिलकर सभी आजादी का अमृत महोत्सव मनाते है." आज देशात सर्वत्र 'घर-घर तिरंगा' ही मोहीम मोठ्या उत्साहात राबविली जात आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने शाळा-महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रम राबविले जात आहेत.परंतु हे करत असताना स्वतंत्र भारतातील भयानक वास्तविकता झाकली जाणे शक्य नाही. १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी भारत देश स्वतंत्र झाला. भारताच्या स्वातंत्र्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे १६ ऑगस्टला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सुमारे २० हजार गोरगरीब, भुकेल्या लोकांचा जमाव विधिमंडळावर नेला. "ये आझादी झुठी है; देशकी जनता भुकी है". अशा त्यांच्या घोषणांनी विधिमंडळाचा परिसर दुमदुमून गेला.**

भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु देशातील गरीब वंचित घटकांना त्यांच्या विकासाची संधी मिळाली नाही. अशी त्यांची भूमिका होती. आजही हर घर तिरंगा फहराएगे अशा घोषणा दिल्या जातात परंतु भारतातील कित्येक लोकांना आजही घर नाही. अशांनी तिरंगा कुठे फडकवायचा असा मोठा प्रश्न पडतो. मुंबई आणि दिल्लीसारख्या महानगरांमध्ये, जिथे भव्य खोल्या, इमारती आणि रईसांचे बंगले आहेत तेथे आपल्याला कोट्यावधी झोपड्या देखील पाहावयास मिळतात. गरिबांना मोडकळीस आलेल्या घरात किंवा झोपड्यांमध्ये रहावे लागते. फक्त पावसात गळत असलेले छतच त्यांच्या नशिबात लिहिलेले आहे. त्यांना शरीर झाकण्यासाठी पुरेसे कपडेही मिळत नाही. गुन्हेगारीचे किडे दारिद्र्याच्या घाणीत वेगाने वाढतात. गरीबी केवळ चोरी, दरोडे, खून, अपहरण, तस्करी इत्यादी गुन्हे करण्यास लोकांना प्रोत्साहित करते. गरीबी ही स्वतंत्र भारतातील प्रमुख समस्या आहे. तिचे पूर्णतः निराकरण करणे अजूनही जमले नाही.

स्वतंत्र भारतातील स्त्री आजही सुरक्षित पहावयास मिळतं नाही. कोणतेही वृत्तपत्र पहा त्यामध्ये दररोज आपणास बलात्कार, विनयभंग, खून, हुंडाबळी सारख्या घटना पाहावयास मिळतात. महिलांच्या सक्षमीकरणासाठी धोरणे आखली जातात. ज्या देशातील पंतप्रधानपद इंदिरा गांधी यांनी भूषविलेले आहे. देशाचे राष्ट्रपती पद भूषविणाऱ्या द्रौपदी मुर्मु असतानाही, खरेच भारतातील सर्व महिला सक्षम आहेत का? सर्वांना विकासाची



समान संधी मिळते का? सर्वच महिला स्वावलंबी आहेत का? हा खऱ्या अर्थाने चिंतनाचा विषय बनला आहे.

हरित क्रांतीमुळे आज देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झालेला आहे. असे असतानाही देशातील अनेक शेतकरी आत्महत्या करत आहेत. दुष्काळ, पूर,नापिकी, महागाई अशा अनेक कारणांमुळे शेती व्यवसाय अडचणीत आलेला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीचे पॅकेज देऊन त्यांचा विकास होणार नाही. अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करावी लागेल की त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होणारच नाही. तेव्हाच जगाचा पोशिंदा आत्महत्या करणे थांबवेल. स्वतंत्र भारतातील सर्वात मोठी समस्या म्हणजेच बेकारी आहे. काम करण्याची प्रचंड ऊर्जा असणारे तरुण आजही बेकार आहेत. हाताला काम नसल्यामुळे हे तरुण गुन्हेगारी विश्वाकडे वळत आहेत. प्रत्येकाला त्याच्या कुवतीप्रमाणे जगण्यासाठी काम मिळणे गरजेचे आहे. केवळ वृत्तपत्रांमध्ये तरुणांसाठी नोकरीच्या लाखो संधी उपलब्ध अश्या केवळ बातम्या झळकविण्यापेक्षा त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

शिक्षणाचे खाजगीकरण झाले. ज्यामुळे शिक्षणाची द्वारे मोठ्या प्रमाणात खुली झाली. परंतु हेच उच्च शिक्षण महागडे झाले आहे.आजही मोठ्या शहरांमधील खाजगी नर्सरी शाळांमधील फी हजारो रुपयांच्या घरामध्ये आहे. शिक्षणाच्या बाजारात अनेक शिक्षण सम्राटांनी आपले महागडी दुकाने थाटली आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांनी शिक्षण कसे घ्यावे? असाही प्रश्न निर्माण होतो. आजही कित्येक बालके शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर गेलेली आहेत. त्यांना सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या प्रवाहात आणणे प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे.

धर्मदाय हॉस्पिटलच्या नावाखाली कोट्यवधी रुपये किमतीच्या शहरांतील मोक्याच्या जागा अतिशय कमीत कमी किमतीमध्ये प्राप्त केल्या जातात. परंतु त्या बहुतेक हॉस्पिटल मधून गोरगरिबांना मोफत उपचार नाकारले जातात. महागडे उपचार करून घेणे गरिबांना परवडत नाही. परिणामी उपचाराअभावी त्यांचा मृत्यू होतो. याला जबाबदार कोण असाही प्रश्न निर्माण होतो. देशातील महागाई दिवसेंदिवस वाढतच चाललेली आहे. अशा परिस्थितीत आपला उदरनिर्वाह कसा करावा? असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. तुटपुंज्या मिळकतीत घर खर्च भागविताना गृहिणींची दमछाक होत आहे.

स्वतंत्र भारतामध्ये आजही जातीच्या आधारावर राजकीय गणिते आखली जातात. माणसापेक्षा जात व धर्म मोठा मानला जातो. परिणामी दुर्दैवाने देशात आजही जातीय व धार्मिक दंगली घडतात. आपण कोणत्याही जात किंवा धर्माचे प्रतीक नसून आपली जात व धर्म अंतिमतः भारतीयच आहे. हे प्रत्येकाने काळजात कोरून ठेवणे गरजेचे आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सांडलेले रक्त कोणत्याही एका जातीचे, धर्माचे किंवा पंथाचे नव्हते तर ते बलिदान भारतीयांचे होते हे समजून घेणे गरजेचे आहे. ज्यावेळी देशात न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता या नीतीमूल्यांची जोपासना होऊन; सर्वांना विकासाची समान संधी मिळेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने भारत देश जगात महासत्ता बनेल. "कांटो मे भी फुल खिलाये, इस धरती को स्वर्ग बनाये, आओ सबको गले लगाये, हम स्वतंत्रता का पर्व बनाये."

# अंमळनेर जिल्हा परिषद शाळेत गावकरी व शिक्षकात वाद

## मारहाण करणाऱ्या तिघांविरोधात तर मुख्याध्यापिकेच्या तक्रारीवरून शिक्षकावर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापुर :** अंमळनेर जिल्हा परिषद शाळेमध्ये शालेय शिक्षण समितीच्या पदाधिकारी आणि शिक्षक यांच्यात वाद झाला, वादाचे रूपांतर हाणामारी पर्यंत गेल्याने गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर याच दिवशी मुख्याध्यापिकेने आपल्याच शाळेतील सहकारी शिक्षकावर जातिवाचक शिवीगाळ व विनयभंग केला असा आरोप करत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेत गटशिक्षणाधिकारी काय कार्यवाही करतात याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.
गंगापूर तालुक्यातील अंमळनेर येथील जि.प.शाळेत शिक्षक भाऊसाहेब मिसाळ यांना शालेय समितीचे उपाध्यक्ष अक्रम युनूस पठाण यांनी तुम्हाला शाळेत येण्यास उशीर झाला आहे, तुम्ही आता हजेरी रजिस्टरवर सह्या करू नका म्हणत अफरोज युनूस पठाण, अक्रम पठाण, अफरोज पठाण या तिघांनी शिक्षक भाऊसाहेब मिसाळ यांना मारहाण करून कारची तोडफोड केली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
अंमळनेर जि.प. शाळेतील शिक्षक भाऊसाहेब आसाराम मिसाळ (रा. मांजरी, ता. गंगापूर) आणि सुनील किसन नवले (रा. नेवासा फाटा, जि. अहमदनगर) या दोन्ही शिक्षकांविरोधात शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिकेने तक्रार दिली आहे की शाळेतील पिण्याच्या पाण्याच्या जारमधून पाणी घेत असताना आरोपी भाऊसाहेब मिसाळ आणि सुनील नवले यांनी मुख्याध्यापिकेला शिवीगाळ करीत विनयभंग केला. तसेच जातिवाचक शिवीगाळ केली. याप्रकरणी फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरून विनयभंग आणि ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

> **शिक्षक भाऊसाहेब मिसाळ हा शिक्षक रोज उशिराने शाळेत येतो नेहमी शाळेत धिंगाणा घालतो. यामुळे वादविवाद चालू असतात याचा राग तो विद्यार्थ्यांवर काढतो. गावकरी बोलण्यास गेले तर त्यांना उदंडपणे बोलुन अपमानीत करतो या शिक्षकाविरुद्ध कठोर कारवाई झाली पाहिजे.**
> **शिवाजी मिसाळ, गावकरी**

> **शाळेतील शिक्षकांचे भांडणे नित्यनेमाचे झाले आहे. दीड महिन्यापूर्वी असेच शिक्षकांचे कडाक्याचे भांडण झाले होते.परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे कानाडोळा केला. भाऊसाहेब मिसाळ हा शिक्षक एका संघटनेचा पदाधिकारी असल्याने तो नेहमी संघटनेची धोस गावकरी व शाळेतील शिक्षकांना देत असतो. यामुळे शाळेतील वातावरण खराब होत आहे.गटशिक्षणाधिकाऱ्यांनी या शिक्षका विरोधात कठोर कारवाई केली पाहिजे.**
> **राजु पठाण, सामाजिक कार्यकर्ते**

# सैनिक बंधूंना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** गुरूवार दि.११ ऑगस्ट २०२२ रोजी राखीपौर्णिमेनिमित्त सेवा आरोग्य फाऊंडेशन संस्थेच्या घे भरारी किशोर विकास प्रकल्प आणि समृद्धी वर्ग प्रकल्पाच्या किशोरवयीन मुलींनी पुण्यातील एका आर्मी युनिटला भेट देऊन सैनिक बंधूंना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.
कार्यक्रमात सुरवातीला सेवा आरोग्य फाऊंडेशन संस्थेच्या घे भरारी किशोर विकास प्रकल्पाच्या प्रकल्प प्रमुख प्रीती पाटकर यांनी सेवा आरोग्य फाउंडेशनच्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. पुणे शहरातील चाळीसहून अधिक वस्त्यांमधील वंचित गटातील आपल्या बांधवांसाठी संस्था आरोग्य, संस्कार व किशोरविकास या क्षेत्रात काम करते. आजच्या नव्या पिढी मध्ये सामाजिक भान निर्माण करण्यासाठी संस्था वेगवेगळे अभिनव उपक्रम राबवते असे त्यांनी सांगितले आणि हा कार्यक्रम राबविण्याची परवानगी दिल्या बद्दल त्यांनी आर्मी युनिट चे आभार मानले.
या भेटीमध्ये संस्थेच्या वस्तीप्रकल्पातील ८५ मुलींनी १२५ सैनिकांना राख्या बांधल्या. मुलींनी घरुन स्वतः आरतीचे ताम्हण सजवून आणले होते. भारतीय संस्कृती प्रमाणे औक्षण करुन त्यांनी सैनिक बांधवांना ओवाळून राख्या बांधल्या तसेच पेढा भरवून आपल्या भावाचे तोंड गोड केले. त्यानंतर या भावांनी सुध्धा आपल्या या बहिणींना गिफ्ट दिले. या राख्या गेले दोन आठवडे एकत्र जमून मुलींनी स्वतः तयार केल्या होत्या.
दोन लेडी आर्मी ऑफिसर्स नी किशोरींना सैन्यातील करिअर च्या संधी, त्या साठी कशा प्रकारे तयारी करायची असते, अभ्यास कसा करायचा, कुठल्या परीक्षा द्यायच्या याचे मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की कुठलेही ध्येय साध्य करताना फोकस्ड काम करणे गरजेचे आहे, कथनी आणि



करनी एक असली पाहिजे. तरच आपण आपले ध्येय सहजपणे गाठू शकतो. सैनिकांचे अनुभव आणि मार्गदर्शन ऐकून भारावून गेलेल्या मुलींनी उत्स्फूर्तपणे अनेक प्रश्न विचारले. लेडी आर्मी ऑफिसर्सनीही खूप प्रेमाने, आस्थेने मुलींच्या प्रश्नांची उत्तरे दिली. मुलींना त्यांच्या बोलण्यातून खूप प्रेरणा मिळाली.
जे लोक आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या देशासाठी रात्रंदिवस मेहनत करतात, त्यांच्यामुळे आपण सुरक्षित आयुष्य जगू शकतो त्यांच्या प्रति कृतज्ञता, आदर व प्रेम व्यक्त करण्यासाठी, नवीन पिढीतील मुलींना आपल्या नागरिक म्हणून जबाबदाऱ्यांची जाणीव होण्यासाठी तसेच या क्षेत्रात मुलींसाठी साठी काय संधी उपलब्ध आहेत याची माहिती होण्यासाठी या क्षेत्र भेटीची आणि आगळ्यावेगळ्या रक्षाबंधनाची खूप खूप मदत झाली आहे.
या देखण्या आणि उत्साहाने साजर्या झालेल्या कार्यक्रमाला सेवा आरोग्य फाऊंडेशन संस्थेच्या घे भरारी प्रकल्पाच्या ७ किशोरी मैत्रीण, समृद्धी वर्गांच्या २ शिक्षिका मुलींसोबत उपस्थित होत्या. सेवा आरोग्य फाऊंडेशन संस्थेच्या घे भरारी किशोर विकास प्रकल्प प्रमुख प्रीती पाटकर, सहसमन्वयक मानसी मोरे, समृध्दी वर्ग प्रकल्प प्रमुख सौ. निरंजनी शिरसट यांनी कार्यक्रमाची शिस्तबद्ध आखणी केली. संपूर्ण कार्यक्रमाच्या नियोजनात सेवा आरोग्य फाऊंडेशन संस्थेच्या घे भरारी व समृद्धी प्रकल्पांच्या पालक संचालक डॉ. हर्षदा पाध्ये, संचालक प्रदीप कुंटे आणि आनंद ओक यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.




# शेती दिनानिमित्त तसेच क्रॉपसॅप शेतीशाळा अंतर्गत शेतकऱ्यांना प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**माळीवाडा :** आज रोजी शेती दिनानिमित्त तसेच क्रॉपसॅप शेतीशाळा अंतर्गत शेतकऱ्यांचा प्रशिक्षण वर्ग मौजे माळीवाडा, ता. औरंगाबाद येथे श्री पारसनाथ कारभारी गाजरे यांच्या शेतात आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमात जैविक कीटकनाशकांचा उपयोग तसेच फवारणी करताना रासायनिक कीटकनाशकांचा मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम तसेच फवारणी करताना घ्यावयाची काळजी याविषयी तांत्रिक समन्वयक गुलाबराव खंडागळे व कृषी सहाय्यक ज्योती चितळकर यांच्याद्वारे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास सरपंच अनिता हेकडे, वनिता गाजरे, पारसनाथ गाजरे, रामलाल पल्हाळ, गणेश आस्वार, अतिश गायकवाड, भानुदास गाजरे, बाबासाहेब गाजरे, महादू फटांगडे, अमोल साठे, सोपान भगत, बाबुराव मुळे, शंकर बाभळे, प्रवीण गाजरे व इतर शेतकरी उपस्थित होते.

# लालबहादूर शास्त्री विद्यालयात विद्यार्थ्यांनी केली 'हर घर तिरंगा'ची जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** भारतीय स्वातंत्र्याच्या 75 अमृतमहोत्सव अंतर्गत आष्टी ता.परतूर येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या वतीने गावात बुधवार गुरुवार विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली.
अधिक माहिती अशी की भारतीय स्वातंत्र्याच्या 75 वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अमृतमहोत्सव साजरा करण्यात येत असून जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील ज्ञात-अज्ञात क्रांतीकारकांचे व स्वातंत्र्य लढ्यात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे व देशभक्तीची जाज्वल भावना कायमस्वरूपी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत ता. 13 ऑगस्ट ते 17 ऑगस्ट या कालावधीत केंद्र शासनाच्या सुचनेनुसार हर हर तिरंगा हा उपक्रम राबवण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून प्रभात फेरीद्वारे जनजागृती करण्यात आली.
प्रारंभी प्राचार्य एल. के. बिरादार व आष्टी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांनी अमृतमहोत्सव 75 याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन फेरीसाठी सुचना दिल्या. फेरी दरम्यान गावातील मुख्य रस्त्यावरुन विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा झेंडा, घोषवाक्याचे फलक घेत वातावरण निर्मिती केली. यावेळी प्राध्यापक, शिक्षकांनी परिश्रम घेतले.




# सातासमुद्रापार आजादी का अमृत महोत्सव माय भूमी प्रतिष्ठानचा आगळावेगळा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

वॉशिंग्टन : अमेरिकेतील मायभूमी प्रतिष्ठान तर्फे भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव 13 ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे. माय भूमी प्रतिष्ठान ही अमेरिकेतून या मातीचे त्या मातीशी नाते जोडण्यासाठी सुरू केलेला उपक्रम आहे. या उपक्रमांतर्गत शब्दांकन व्याख्यानमाला आयोजित केली जाते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी माय भूमीच्या व्याख्यान मध्ये ज्येष्ठ अभिनेते आणि व्याख्याते शरद पोंक्षे यांचे सावरकर विचार दर्शन या विषयावर व्याख्यान होणार आहे. याआधी शब्दांकन व्याख्यानमालेत प्रवीण दवणे, मयूर भावे, राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे तसेच सत साहित्याच्या अभ्यासक अपर्णाताई बेडेकर यांचे व्याख्यान यादी झाली आहे. माय भूमी प्रतिष्ठानने व्याख्यानमालेसोबतच छोटे आणि मोठ्या वयोगटाच्या कलाकारांना संधी मिळावी म्हणून चित्रकला गायन आणि कथाकथन स्पर्धेचे ही आयोजन केले होते. खूप उत्सव उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेल्या या स्पर्धेतील सहभाग MYभूमीच्या फेसबुक पेजवर बघता येईल. जगभरातून शेकडो विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. मावळा द बोर्ड गेम तर्फे विजेत्यांना त्यांना पारितोषिक देण्यात येणार आहे.

myभूमी प्रतिष्ठान
नाते, या मातीचे त्या मातीशी

आमच्या संवाद दात्याशी बोलताना माय भूमीच्या संचालिका रसिका नेर यांनी अशा प्रकारच्या उपक्रमांची समाजाला गरज असल्याचे प्रतिपादन केले. या उपक्रमातून समाजप्रबोधनासोबतच कला गुण आणि आपल्या संस्कृती विषयीचे बीज विद्यार्थ्यांमध्ये रुजवता येईल असे ही त्यांनी म्हटले. अधिक माहितीसाठी माय भूमीच्या फेसबुक पेजवर संपर्क केला जाऊ शकतो.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DC दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• पासबुक व पावतीची सोय
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट
गणिताच्या मूलभूत संकल्पना (१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त) MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/- पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/- पाने ५३४
उखाण्यातून गणित मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/- पाने ३६४
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल, भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकिजवळ, बीड मो. 8149196415
दत्तराज पार्क, बायपासरोड, सावतानगर, गेवराई मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट, मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ, धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# नादुरुस्त होकायंत्रामुळे बेलोरा मंडळ अतिवृष्टी मदतीपासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** तालुक्यात यावर्षी पावसाने झोडपले असून शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यातच तालुक्यातील माळपठारावर मागील काही दिवसांपासून ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. परंतु बेलोरा येथील पर्जन्यमान मापक होकायंत्रात बिघाड झाल्याने व शासकीय निकषानुसार ६५ मीमी च्या वर पावसाची नोंद होकायंत्रावर न झाल्याने बेलोरा मंडळ अतिवृष्टी मदतीपासून वंचित झाले आहे. पुसद तालुक्यात यावर्षी माळपठारावर पावसाने प्रचंड प्रमाणात शेतीचे नुकसान झाले असून माळपठारावरील शेतकऱ्यांची केवळ खरीप हंगामावरच भिस्त असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

याबाबत दि. ११ ऑगस्ट रोजी उपविभाग अधिकारी डॉ. व्यंकट राठोड यांना माळपठारावरील शेतकऱ्यांनी निवेदन देऊन बेलोरा मंडळातील शेतीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची मागणी केली असून मागणी मान्य न झाल्यास दि.२२ ऑगस्ट रोजी पुसद वाशिम रोडवरील मारवाडी फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.बेलोरा मंडळातील प्रत्येक गावातील ग्रामपंचायत मधून अतिवृष्टी चे ठराव घेऊन शासनाकडे पाठविण्यात येणार आहेत.



यावेळी माळपठारावरील माजी जिप सभापती बी.जी. राठोड, माजी पंस सभापती विवेक मस्के, शिवानंद कांबळे, सुभाष कांबळे, जांबुवंतराव राठोड, मोतीराम राठोड, दिपक हरीमकर, शेषराव राठोड, प्रा.दत्ता पवार, विष्णु चव्हाण, किशोर चव्हाण, सुभाष राठोड, राजू कोकरे, आशिष पंडीत, मधुकर जाधव, रविंद्र पारीसकर, डॉ.मधुकर राठोड, पंजाबराव मस्के, ढाले आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> पुसद तालुक्यात यावर्षी सर्वत्र सतत पाऊस पडत असून अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी मी शासन स्तरावर प्रयत्न करीन.
>
> डॉ. व्यंकट राठोड
> उपविभाग अधिकारी, पुसद

> प्रत्यक्षात माळपठारावर शेतीपिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून केवळ होकायंत्रावर अवलंबून न राहता शासकीय स्तरावर त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी याबाबत जिल्हाधिकारी यांना बोललो.
>
> आ.निलय नाईक
> विधानपरिषद सदस्य

> पुसद तालुक्यातील प्रत्येक मंडळात होकायंत्र बसविण्यात आले असून शासकीय नियमानुसार होकायंत्रावर ६५मीमी घ्या वर पावसाची नोंद न झाल्यास अतिवृष्टीची नोंद होत नाही. बेलोरा मंडळातील होकायंत्रावर पावसाची ६५मी.मी घ्या आतच नोंद असल्याने सध्या स्थितीत बेलोरा मंडळाचा अतिवृष्टीमध्ये समावेश झाला नाही.
>
> प्रशांत नाईक
> उपविभागीय कृषी अधिकारी, पुसद




# माऊलीसाठी आली आपेगावी मुक्ताईची राखी

## आपेगावात अनुभवला बहीण- भावाच्या प्रेमाचा क्षण

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**आपेगाव :** बहीण-भावाच्या नात्याचा पवित्र सण म्हणजे रक्षाबंधन. या पवित्र धाग्याचे नाते जपत मुक्ताईनगर येथील संत मुक्ताबाई संस्थांच्या वतीने दरवर्षी संतश्रेष्ठ ज्ञानोबाराय, तसेच संत निवृत्तीनाथ व सोपानकाका यांना दरवर्षी राखी पाठवण्याची परंपरा याही वर्षी संस्थांनी कायम ठेवली. संत ज्ञानेश्वर महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या आपेगाव येथे दरवर्षी संत मुक्ताबाई संस्थानकडून आपल्या तीनही भावंडांना राखी पाठवली जाते. मागील काही वर्षांपासून ही परंपरा संस्थाने कायम ठेवली असून, मुक्ताई संस्थांकडून बहीण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या राखीच्या धाग्याने ही संस्थाने केवळ जोडली गेलेली नसून, प्रेमाचा ओलावाही निर्माण झाल्याची माहिती सेवेकरी भागवत पाटील यांनी दिली.

समाजाकडून झालेल्या त्रासाला कंटाळून झोपडी बंद करून बसणार्या ज्ञानदेवाना उपदेश करत निराशेच्या गर्गेतुन बाहेर काढणार्या मुक्ताई मुळेच ज्ञानदेव संत झाले आणि त्यांनी जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले. अशा या लहाणग्या मुक्ताईचे भगिणी प्रेम मुक्ताईनगर संस्थानने केले आहे.या संस्थानकडुन संत मुक्ताई च्या वतीने भाऊ संत ज्ञानदेवासाठी ज्ञानेश्वर महाराज संस्थान आपेगाव जन्मगावी परंपरेने राखी अर्पण केली आहे. बहिण भावाच्या गोड आणि अनोख्या परंपरेची अवघ्या आपेगावकरानी शेकडो वर्षानंतरही अनुभवले असेच म्हणावे लागेल मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष भैय्यासाहेब ऊर्फ रविंद्र पाटील यांनी ही परंपरा जपली असुन संस्थानच्या वतीने सेवेकरी साधनाताई भागवत पाटील, अश्विनी महेंद्र पाटील या भगिनींनी आपेगाव येथे येवून संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील माऊलीला राखी बांधुन भाऊ बहिणीच्या या रक्षाबंधनाच्या सणाला उजाळा दिला.

याप्रसंगी मुक्ताई संस्थानच्या वतीने भागवत पाटील, महेंद्र पाटील तर आपेगाव संस्थानच्या वतीने अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूरकर, भागवताचार्य शिवाजी महाराज सेलुकर, भाऊसाहेब औटे (नाना) रामभाऊ औटे, आन्नासाहेब मालीपाटील, नरके सर, ग्रामविकास अधिकारी जिजासाहेब मिसाळ, तात्यासाहेब मोरे, ज्ञानेश्वर मिसाळ, आगरनांदुरचे नवनिर्वाचित सदस्य मनोहर थोरात, शशिकांत केसभट, लक्ष्मण कोल्हे उपस्थित होते.

# दरोडयाच्या तयारीत असलेली टोळी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** शेवगाव ते गेवराई जाणारे काही इसम हे शेवगाव शहरात कोठेतरी दरोडा टाकणार असुन ते सध्या शेवगाव ते गेवराई जाणारे रोडलगत असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ पत्र्याचे टपरीचे आडोशाला बसुन दरोडा टाकण्याची तयारी करत आहेत, अशी बातमी पोलीस निरीक्षक विलास एस. पुजारी यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळाल्याने पोलीस निरीक्षक विलास एस.पुजारी यांनी सहा.पोलीस निरीक्षक बागुल सहा. पोलीस निरीक्षक, आशिष शेळके, रात्रगस्त ड्युटीचे अंमलदार पो. ना / ३५ रामेश्वर वसंत घुगे, चा.पो.ना. संभाजी धायकतडक, पो.ना अशोक लिपणे, पो.ना नागरगोजे तसेच होमगार्ड झिरपे, होमगार्ड शेकडे यांना तात्काळ शेवगाव पोलीस स्टेशन येथे बोलावून बातमीतील हकीगत समजावून सांगून तात्काळ शेवगाव पोलीस स्टेशनची शासकीय जीप क्रमांक MH-१६ N-३३१ मधुन बातमीतील नमुद ठिकाणी रवाना झाले.

बातमीतील माहिती प्रमाणे शेवगाव ते गेवराई जाणारे रोडलगत असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ पत्र्याचे टपरीचे आडोशाला पाच इसम बसलेले शासकीय वाहनाचे हेडलाईटचे उजेडात दिसुन आल्याने जागीच वाहन थांबुन सदर इसमांकडे पोलीस पथक गेले असता सदरचे बसलेले इसम पोलीसांना पाहून पळू लागले त्यामुळे पोलीस पथकाने सदर इसमांपैकी चार जणांना पाठलाग करून पकडले एक इसम अंधाराचा फायदा घेवून पळुन गेला. पकडलेल्या इसमांना त्यांची नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे मंगेश नामदेव मडके, संकेत संतोष जगताप, निलेश ऊर्फ कानिफनाथ राजन ऊर्फ सजन नेमाने, आकाश रोहिदास तेलोरे असे असल्याचे सांगितले व पळुन गेलेल्या इसमाचे नाव अनिल मातंग असे असल्याचे सांगितले. सदर इसमांची झडती घेतली असता त्यांचे कब्जात दरोडा टाकण्यासाठी लागणारे साहित्य- एक लोखंडी चमकदार दोन अर्धगोलाकार पाते असलेली फरशी कुन्हाड, एक लोखंडी गज, एक पिवळ्या रंगाची नायलॉन दोरी, लाल मिरची पुड, एक लाकडी दांडा तसेच दोन मोटार सायकल व मोबाईल असा एकुण १,४०,०००/- रूपये किमतीचा मुद्देमाल मिळुन आला आहे.

फरार आरोपी अनिल मातंग रा. हातगाव ता.शेवगाव याचे विरूद्ध गुन्हे दाखल आहेत. सदर कामगिरी मनोज पाटील, पोलीस अधीक्षक, अहमदनगर सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर, संदीप मिटके उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीरामपुर विभाग चार्ज शेवगाव उपविभाग शेवगाव, विलास एस. पुजारी पोलीस निरीक्षक शेवगाव पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. रविंद्र बागुल, स.पो.नि. आशिष प. शेळके, पो.ना. आर.व्ही.घुगे, पो.ना/ अशोक लिपणे, चा.पो.ना संभाजी घायतडक, पो.ना राजेंद्र नागरगोजे, पो.शि. सुनिल रत्नपारखी यांनी केली आहे.





स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त तहसील कार्यालय लोणार येथे करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोशनाई

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# ...तर सरकारचे कपडे उतरवू

## अर्ध नग्न आंदोलनात शेतकरी नेत्यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतक-यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. यवतमाळ जिल्हयात कापूस, सोयाबिन सह सर्वच पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. दरम्यान आज पंचनामे न करता सरसकट मदत देण्याच्या मागणीसाठी यवतमाळात अर्धनग्न आंदोलन करण्यात आले. सरसकट मागणीचा निर्णय मान्य न केल्यास सरकारचे कपडे उतरवू असा इशारा शेतकरी नेते विनायक पाटील तसेच सिकंदर शहा यांनी याप्रसंगी दिला आहे.

गेल्या पंचविस दिवसापासून सुरु असलेला पाऊस थांबायला तयार नाही. या पावसामुळे शेतकऱ्यांचा खरीप हंगाम पाण्यात गेला असून सरकारने ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजाराची मदत करण्याची मागणी शेतकरी वारकरी संघटनेच्या वतीने याआधीच करण्यात आली होती. सरकारने अजुनही ठोस कारवाई न केल्याने आज यवतमाळात शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला. स्थानिक आझाद मैदानातून शेतकरी नेते विनायक पाटील, सिकंदर शहा यांच्या नेत्रृत्वात अर्धनग्न मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा घोषणा देत जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला.

संततधार पावसामुळे संपुर्ण राज्यभरात शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे आता पंचनामे करण्यापेक्षा सरसकट मदत देण्याची तसेच रोजगार हमी योजनेतून शेतमजुरांना मजुरी देण्याची मागणी विनायक पाटील तसेच सिकंदर शहा यांनी केली आहे. खरीप हंगाम पाण्यात




गेल्याने गेल्या दोन महिण्यापासून राज्यात सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु होत्या. अजुनही सरकार शेतकऱ्यांच्या मागणीकडे गंभीरतेने बघायला तयार नाही. नदी तसेच नाल्याच्या काठावरीत शेती तर खरडून गेली आहे. अतिवृष्टीमुळे खरीप हंगामाची माती झाली आहे. त्यामुळे सरसकट मदतीची मागणी करण्यात आली असून सरकारचे कपडे उतरविण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनात बाळू चव्हाण, बाळू विरुपकार, विलास सोमोटे, विलास राठोड, छगन राठोड, रुषीकेश पिंपळकर, केदार गायकी, दिपक मडसे इत्यादी शेतकरी सहभागी झाले होते.

### नेत्यांच्या पैशाचा पंचनामा करु

**संततधार पावसामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा परीस्थितीत सरकार मात्र पंचनामे करण्यात वेळ घालवित आहे. सर्वच शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असल्यामुळे सरसकट मदत देणे गरजेचे आहे. असे न झाल्यास सरकार स्थापनेसाठी पन्नास आमदारांनी किती पैसे घेतले याचा पंचनामा आम्ही केल्याशिवाय राहणार नाही.**

**विनायक पाटील**
**शेतकरी नेते, लातुर**



# कल्याण एस टी आगार म्हणजे दुर्गंधी, दुर्व्यवस्था यांचे ठिकाण

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** येथील एसटी स्थानक आगार म्हणजे ठाणे, पुणे, पालघर तसेच अनेक जिल्ह्यांना जोडणारे मुख्य ठिकाण. परंतु या आगारात सुविधांचा इतका अभाव आहे की, प्रत्येक प्रवाशाला इथून प्रवास करणे प्रचंड त्रासदायक ठरत आहे. प्रवाशांना बसायला असलेल्या निवाऱ्यात दुर्गंधी आणि उंदरांचा सुळसुळाट असतो. त्यात भर पावसात इथे जाणं म्हणजे साचलेल्या पाण्यातून तारेवरची कसरत करण्यासारखेच आहे. अत्यंत दूरव्यवस्था असलेल्या या आगाराकडे शासनाचं, परिवहन व्यवस्थापनाचे लक्ष जाईल का? हा प्रश्न सर्व प्रवाशांना नक्कीच पडतोय. प्रवाशांचा प्रवास सुकर व्हावा, याचा विचार म्हणून या प्रश्नाकडे नक्कीच लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

# भारतीय संस्कृती प्राचीन व सर्वश्रेष्ठ : प्रमोद कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई सिंचलित स्वा सावरकर माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय बीडमध्ये विद्यासभा अंर्गत अभ्यासपुरक उपक्रमाद्वारा विविध मंडळ रचना असुन यामध्ये संस्कार मंडळ द्वारा संस्कृत दिन महत्व रक्षाबधंन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संस्कृत दिन व रक्षाबंधन याविषयी विद्यार्थ्यांना प्रमुख वक्ते प्रा. संतोष जोशी यांनी मार्गदर्शन केले.

संस्कृत भाषा ही सर्व भाषाची जननी होय. या भाषेचे आजच्या संगणकीय कार्यात उपयूक्तता सिध्द झाली आहे. भारतीय साहित्य या भाषेत विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. ही भाषा आत्मसात करुन आपण करिअर बनवु शकतो तसेच भारतीय संस्कृतीत रक्षाबंधन हा सण महत्वाचा आहे. बहिणी भावास राखी बांधुन आतुट प्रेमाच्या धागा बांधुन ती भावना व्यक्त करते व भावास दिर्घायु लाभो ही प्रार्थना मनोमन ईश्वराकडे करते.

अध्यक्षीय समारोप प्रमोद कुलकर्णी यांनी करताना सांगितले की, संस्कृतसह अन्य भाषा शिकण्याची सुविधा नवीन शैक्षणिक धोरणात उपलब्ध आहे तसेच राखी पौर्णिमा हा सण बहीण भावाच्या नात्याचे प्रतिक आहे. विविध सण उत्सव भारतीय समाजात साजरे केले जातात. अशी भारतीय संस्कृती प्राचीन व सर्वश्रेष्ठ आहे. आपण आजच्या दिनी एकमेकांच रक्षण करणे व राष्ट्रकार्यात क्षमतेनुसार विविध क्षेत्रात योगदान देण्याचा संकल्प करु या बंधनात आपण राहु या.

यावेळी व्यासपीठावर प्रमोद कुलकर्णी शालेय समिती अध्यक्ष प्रमुख वक्ते प्रा.संतोष जोशी, विभाग प्रमुख प्रा.बाळासाहेब साळवे उपस्थित होते. विशेष विद्यार्थींनी, प्राचार्य संजय विभुते, प्रा. चंद्रकांत मुळे, उमेश जगताप व उपस्थित मान्यवरांना राखी बांधली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शशिकांत पसारकर यांनी केले. कल्याण मंत्र घेवुन कार्यक्रमाची सांगता झाली. संस्कार मंडळ प्रमुख प्रा.मनिषा कुलकर्णी व सहकारी प्राध्यापकानी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. विद्यार्थी व शिक्षक कार्यक्रमास उपस्थित होते.



# 'उमेद' च्या महिलांचा बँक अधिकाऱ्यांसोबत संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मुंडवाडी दि.११ ऑगस्ट रोजी जिजाऊ ग्रामसंघाने आर्थिक साक्षरता या विषयात गावातील सर्व स्वयं सहायता समुहांसाठी जिजाऊ महिला ग्रामसंघातर्फे महिला मेळाव्याचे आयोजन केले होते. स्वराज्य महोत्सवा अंतर्गत ग्रामसंघाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केलेले असुन त्याचाच एक भाग म्हणुन आजच्या कार्यक्रमाचे नियोजन केलेले होते. बँक ऑफ महाराष्ट्रचे शाखाधिकारी व्यंकटेशजी काथार, तालुका अभियान व्यवस्थापक संदिप जाधव, प्रभाग समन्वयक रामेश्वर मोरे यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. स्वयं सहायता समुहांचे कर्ज वितरण, परतफेड, पंतप्रधान सुरक्षा विमा योजना व पंतप्रधान जिवन ज्योती योजना, समुहांना देण्यात येणारे १० लाख रुपयांचे कर्ज, पंतप्रधान व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुद्रा योजना यासह विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. शाश्वत उपजिविका या विषयात तालुका अभियान व्यवस्थापक संदिप जाधव यांनी प्रकाश टाकला व अन्नप्रकीया उद्योग, समुहांचे विविध स्टॉल, उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री, मार्केटिंग या विषयात मार्गदर्शन केले.

प्रभाग समन्वयक रामेश्वर मोरे यांनिही उमेदच्या विविध योजना जसे की समुदाय गुंतवणुक निधी, VRF, उमेद व ग्रामसंघाच्या मार्फत राबविल्या जाणार्या विविध योजना योजनांची माहिती दिली. सोबतच हर घर तिरंगा या उपक्रमा साठी स्वयं समुहातील सदस्यांना तिरंगा ध्वजाचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे नियोजन समुदाय संसाधन व्यक्ती चित्रा मगर, उज्वला तायडे, बँक सखी महेश्वरी दांडगे, उपजिविका सखी श्रद्धा मगर सह, ग्रामसंघ अध्यक्ष शैला दांडगे, सचिव करिश्मा शिंदे, कोषाध्यक्ष माया बोडखे, लिपिका संगिता तायडे यांनी केले. बँक ऑफ महाराष्ट्राचे सिद्धार्थ नरवडे, गावातील सर्व समुहातील अध्यक्ष, सचिव सह ग्रामसंघाचे सर्व सदस्य रोहिनी मोरे, हिराबाई दांडगे, उज्वला तायडे, अनिता शिंदे, ज्योती पाटणकर, योगिता मोरे, वैशाली बारगळ, पुष्पा खोसरे, लताबाई गवळी,ज्योती राजपुत, रेखा बारगळ, विमल बनसोड, सह शेकडो महिला या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# बाप्पाच्या आगमनाची चाहूल; मूर्तिकारांसह गणेश मंडळाकडून जोरदार तयारी

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कोरोनामुळे दोन वर्ष उत्सवांवर मर्यादा होत्या परंतु यावर्षी सर्व मंडळाचा उत्साह आणि गेले दोन वर्षाची मर्यादा लक्षात घेऊन यंदा दहीहंडी व गणेशोत्सव उत्साहात साजरे करण्यासाठी सरकारने कोणतेही सणांवर कसलीही निर्बंध ठेवलेले नाहीत यावर्षीचा गणेशोत्सव हा मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या उत्सवानिमित्त बाप्पाच्या आगमनाची जोरदार तयारी कन्नड शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सुरू झाली आहे गेल्या दोन तीन महिन्यांपासून बाप्पाच्या मूर्तीला आकार देऊन मूर्ती बनवण्याचे काम कारागीरांमार्फत करण्यात येत आहे.

मात्र आता बाप्पाच्या स्थापनेला 20 ते 21 दिवसाचा वेळ असल्याने कारागीराने युद्ध स्तरावर काम सुरू केले आहे.

यावेळी गणेश मूर्तीचा आकार भव्य असणार आहे कोरोनाच्या दोन वर्षानंतर आता सर्व काही व्यवस्थित झाले असताना इतर सण उत्सावाबरोबरच यावर्षी गणेशोत्सव देखील सर्वत्र मोठ्या उत्साहात व भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहेत.

गणेश उत्सवानिमित्त होणाऱ्या बाप्पाच्या आगमनासाठी जय्यत तयारी कन्नड शहरासह तालुक्यातील गाव खेड्यात व तांड्या वस्ती सुरू झाली आहे यावेळी गणेशोत्सव हा सार्वजनिक स्वरूपाबरोबरच घराघराही उत्साहात साजरा केला जाणार आहे. यावर्षी बाप्पाची मूर्ती ही भव्य मोठी ही बनाविल्या जात आहेत उंच व मोठ्या मूर्तीला चांगलीच मागणी असल्याची माहिती औराळा येथील प्रसिद्ध मूर्तिकार नवनाथ वंजारे यांनी दैनिक आधुनिक केसरीच्या पत्रकारांना दिली आहे. कारागीर ही आकर्षक व मोठ्या आकाराच्या मूर्ती बनविण्याकडे लक्ष देत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# आझादी का अमृत महोत्सवानिमित्त भोकरमध्ये देशभक्तीपर गीतांमधून प्रभावी जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भारतीय स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होत असून आझादी का अमृत महोत्सवानिमित्त शासनाच्या वतीने विविध कार्यक्रम घेतले जात आहेत, हरघर तिरंगा मोहीम हाती घेण्यात आली असून भोकर मध्ये दि. 11 ऑगस्ट रोजी सलाम तिरंगा हा देशभक्तीपर गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर झाला या कार्यक्रमास नागरिक, विद्यार्थी, शिक्षक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भोकर तहसील कार्यालय व गट शिक्षण अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आझादिका अमृत महोत्सव हरघर तिरंगा महीमेची व्यापक जनजागृती व्हावी या हेतूने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दि.11 ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता देशभक्तीपर क्रांतिकारी गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, पोलीस निरीक्षक विकास पाटील, गटशिक्षणाधिकारी एम.जी. वाघमारे यांच्या हस्ते उद्घाटन करून हर घर तिरंगा मोहीम यशस्वी करावी असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमात सत्यम शिवम सुंदरम, मेरे देश की धरती, नन्हा मुन्ना राही हु, जय जय महाराष्ट्र माझा, यह देश है वीर जवानों का, ये मेरे वतन के लोगो अशी बहारदार गीते सादर करण्यात आली.

क्रांतिकारी गीतामधून देशाभिमान जागृत करण्यात आला प्रख्यात गायिका हर बंस कौर, प्रख्यात, गायक श्रीरंग चिंतेवार नांदेड यांनी एकाहून एक बहारदार सादर गीते सादर करून प्रेक्षकांना खीळवून ठेवले, ऑर्गन वादक महेंद्र कदम, प्याड किशोर आवटे, तबला पत्रकार बाबुराव पाटील यांनी उत्कृष्ट साथ दिली सुरेख अशा सूत्रसंचलना मधून पत्रकार बी.आर. पांचाळ यांनी भारतीय स्वातंत्र्याचा इतिहासच मांडला, बाल गायक संकल्प जाधव, यांनीही क्रांतिकारी गीते सादर केली, विमल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गीत व नृत्य सादर केले.

शिक्षक शिंदे, साबळे यांनीही गीते गायली, तहसीलदार राजेश लांडगे यांनी आजादी का अमृता महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा मोहीम सर्वांनी मिळून यशस्वी करावी प्रत्येकाच्या घरावर ध्वज फडकवावा असे आवाहन केले. या कार्यक्रमास नायब तहसीलदार संजय सोलंकर, शिक्षण विस्तार अधिकारी अनिल शिरसाट, सोनटक्के, केंद्रप्रमुख जकीयोदिन, यांच्यासह शिक्षकवृंद नागरिक विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते सुरेख सूत्रसंचालन पत्रकार बी.आर. पांचाळ यांनी केले तर आभार सुधांशू कांबळे यांनी मानले.

# ऑनलाइन आर्थिक लूट टाळण्यासाठी ग्राहकांनी सजग राहावे : शेषराव जाधव

## लासूरला लक्ष्मी पतसंस्थेत अलंकार व डॉ. हेडगेवार पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने अर्थ साक्षरता शिबिर

आधुनिक केसरी न्यूज



**गंगापूर :** भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत दिनांक 12 ऑगस्टला पतसंस्थेत अर्थसाक्षरता शिबिर राबवून दिनांक 13/8/2022 ते 15/8/2022 हे तिन्ही दिवस तिरंगा उभारून सदर शिबिरादरम्यान ग्रामस्थ व महिला यांना बचतीचे महत्त्व ऑनलाइन फसवणूक व तसेच पतसंस्थेच्या योजनेविषयी माहिती देण्यात आली.

यावेळी बोलताना लक्ष्मी पतसंस्थेचे अध्यक्ष शेषराव जाधव म्हणाले की, सध्या सोशिअल मीडियामुळे ग्राहकांना ऑनलाईन लुटण्याचे प्रमाण सध्या वाढले असून त्यामुळे सोशिअल मीडियावर कोणत्याही लिंकला डाउनलोड करू नये व आधार, पॅनकार्ड ही कोणालाही पाठवू नये तसेच कुठलीही बँक किंवा शासकीय कार्यालय ग्राहकांना ओटीपी विचारात नाहीं त्यामुळे कोणालाही कुठलाही ओटीपी सांगू नये कारण त्यामुळे आपली आर्थिक लूट होऊ शकते त्यामुळे ग्राहकांनीच सजगता बाळगावी असे सांगितले.

सध्या ऑनलाईन पैश्याची लूट टाळण्यासाठी ग्राहकांनी कुठलाही आर्थिक व्यवहार करताना काळजी घ्यावी असे आवाहन खरेदी विक्री संघांचे संचालक ज्ञानेश्वर वाघचौरे यानी सांगितले तर कार्यक्रमचे आभार प्रदर्शन कृषी उत्पन्न बाजार समितिचे संचालक वाल्मिक पाटील चव्हाण यानी केले.

दरम्यान यावेळी बाजार समितीचे संचालक सुनिल पाखरे, स्वरूपचंद कुकलारे, भाऊसाहेब गाडेकर, डॉ.हेडगेवार पतसंस्थेचे अद्यक्ष माजी सरपंच प्रदीप भुजबळ, अलंकार पतसंस्थेचे अरुण जाधव, अलंकार व हेडगेवार पतसंस्थेचे व्यवस्थापक किशोर पाटील चव्हाण, अल्पबचत प्रतिनिधी अमोल ठोंबरे, भाऊसाहेब मांडवगड, भारत जाधव, प्रमोद बनकर, उज्ज्वल सिरसाठ, सुनिल थोरात, रोहित साळवे, अजय त्रिभुवन, अनिकेत वाकेकर, आदित्य सिरसाठ, हरिश्चन्द्र घिटरे, नामदेव बडोगे, प्रवीण अडसूळे, ज्ञानेश अवधूत कुलकर्णी, कृष्णा विश्वभर, दीपक दाभाडे आदी बँकेचे ग्राहक उपस्थित होते.



# प.पू. लक्ष्मण चैतन्य बापूजी महाराज जयंती दिवस मोठ्या उत्साहात साजरा करणार

आधुनिक केसरी न्यूज

कन्नड : तालुक्यातील वडनेर येथील चैतन्य साधक परिवार या वर्षी प.पू. लक्ष्मण चैतन्य बापूजी यांचा जयंती दिवस 15/8/2022 रोजी मोठ्या उत्साहात साजरा करणार आहे. मागील दोन वर्षे कोरोना च्या पार्श्वभूमीवर कुठल्याही प्रकारचे कार्यक्रम साधकांना घेता आले नाही. या वर्षी सरकारने सर्व कार्यक्रम निर्बंध मुक्त केल्याने भाविक भक्तात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी प.पू. लक्ष्मण चैतन्य बापूजी यांचा जयंती दिवसानिमित्त वडनेर येथे अन्नदान सेवा म्हणून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. यासाठी गावातील विविध शासकीय, निमशासकीय नोकरीतील अधिकारी, कर्मचारी, सेवा निवृत्त शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचारी आदी सह ग्रामस्थ व युवक यांच्या वतीने अन्नदानासह भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळातर्फे भव्य रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळ संभाजीनगरतर्फे भारतीय स्वातंत्र्याच्या




अमृत महोत्सव निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन 15 ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. रक्तदान ही सध्या काळाची गरज आहे व रक्ताच्या तुटवड्यामूळे खूप परिस्थिती बिघडत आहे. हल्ली अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे व अचानक रक्ताची गरज भासते व रक्ताची कमतरता भासते म्हणून जास्तीतजास्त संख्येने या पुण्याच्या कार्यात सहभागी होऊन हातभार लावावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे, कै. शंतनु चौधरी यांच्या प्रयत्नांतून रक्तदान शिबिराचे हे पाचवे वर्ष आहे, असे अनेक सामाजिक उपक्रम देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळतर्फे घेण्यात येतात. हे शिबिर शहराच्या मध्यवस्तीत कलश मंगल कार्यालय, उस्मानपूरा येथे दि.१५/०८/२०२२, सोमवार रोजी सकाळी ७:३० ते २ या वेळात घेण्यात येणार आहे.

या पुण्यकार्यातून मंडळ कै. शंतनु चौधरी यांना आदरांजली वाहणार आहे. या शिबिराचे प्रकल्प प्रमुख अनंत कुलकर्णी, श्रीपाद मुगुटे व प्रशांत दाभाडकर हे आहेत तर मंडळाचे नरेश जोशी, पद्माकर कोटचीरकर, वैभव देशपांडे, नरेश पटवर्धन, अंबादास कुलकर्णी, रविंद्र पंडित, डॉ. अमोल पांडव, रवि जेहुरकर, रमेश एकबोटे हे शिबिर यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत आहेत. नाव नोदणी 9371586722, 9923450457, 9011431956 या मोबाइल नंबरवर करावी. रक्तसंकलन - दत्ताजी भाले रक्तकेंद्र, डॉ. हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद, फोनः 0240-235271, 2335196.



# जी आय वन हॉस्पिटल कार्यारंभ दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जी आय वन हॉस्पिटल पोट व लिव्हर विकार संस्था यांचा चौथा कार्यारंभ दिन ९ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ३ वर्षापूर्वी जी आय वन रुग्णसेवेचा प्रारंभ करण्यात आला होता. मेडिकल गॅस्ट्रोएन्टरोलॉजिस्ट डॉ. वैभव गंजेवार, डॉ. अशोक मोहिते, डॉ. विनय झंवर, आणि सर्जिकल गॅस्ट्रोएन्टरोलॉजिस्ट डॉ. संदीप भालसिंग, डॉ. मुकेश राठोड ह्या पाच नामवंत गॅस्ट्रोएन्टरोलॉजिस्टनी मिळून हे हॉस्पिटल ९ ऑगस्ट २०१९ रोजी सुरु केले त्याला ९ ऑगस्ट २०२२ रोजी तीन वर्ष पूर्ण होऊन, चौथ्या वर्षात यशस्वी पदार्पण करीत आहे.

जी आय वन हॉस्पिटल कार्यरंभ दिनानिमित्त जी आय वन हॉस्पिटल आणि दत्ताजी भाले रक्तपेढी औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात रुग्णालयातील डॉक्टर तसेच कर्मचारी मिळून ३७ जणांनी रक्तदान केले. यावेळी दत्ताजी भाले रक्तपेढी यांचे पदाधिकारी डॉ. दिलीप डांगे याची उपस्थिती होती. जी आय वन हॉस्पिटलच्या कार्यरंभ दिनानिमित्त रुग्णांना फळ वाटप कार्यक्रम देखील करण्यात आला.

सहकार्याने आणि सहभागाने हे हॉस्पिटल भविष्यात आणखी प्रगती करून आणि रुग्णांना अविरत व उत्तम सेवा देण्याचे ध्येय ठेऊन मराठवाड्यातच नव्हे तर महाराष्ट्र भर ह्या हॉस्पिटल चे नाव मोठे होईल असा संकल्प सोडू असा सर्व संचालकामार्फत संदेश देण्यात आला. आणि नवीन उपचार पद्धती फाइन स्कॅन, लेजर, एंडोस्कोपीक अल्ट्रासाऊंड, आय आर लेप्रोस्कोपीक याबाबत माहिती देण्यात आली.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## लैंगिक समस्या निदान व उपचार...

आधुनिक केसरी

**अझूस्पर्मिया म्हणजे काय?**
कोणत्याही प्रकारचा मृत किंवा जिवंत शुक्राणू जर धातूमध्ये नसेल तर त्याला अझूस्पर्मिया असे म्हणतात.

**ओलीगोस्पर्मिया :** नॉर्मलपेक्षा कमी उदा १० मिलियनपेक्षा कमी संख्या असल्यास ओलिगोस्पर्मिया म्हणतात.

**अस्थेनोस्पर्मिया :** जेव्हा शुक्राणूंची गति अतिशय कमी असते तेव्हा अस्थेनोस्पर्मीया असे म्हणतात.

**ओलिगों-अस्थेनोस्पर्मिया :** जेव्हा शुक्राणूंची संख्या कमी असते, त्यांची गती कमी असते किंवा ते जागीच पडून असतात तेव्हा त्याला ओलिगो-अस्थेनोस्पर्मिया म्हणतात.

**आता यांची कारणे काय असतात ?**
प्रीटेस्टिक्युलर : म्हणजे काही हर्मोन्स किंवा हायपोथेलेमो पिट्युटरी गोण्याडल ॲक्सिसमध्ये असणारे प्रोब्लेम्स उदा. टेस्टेस्टोरॉनची मात्रा कमी असणे इ.

**टेस्टिक्युलर :** म्हणजे जन्मतःच अंडाशय नसणे किंवा लहान असणे.

**पोस्ट टेस्टिक्युलर :** म्हणजे वीर्य वाहिनीला अडथळा असणे इ.

**व्हेरिकोसील :** म्हणजे अंडाशयाची नस वाढल्याने अंडाशयाचे तापमान वाढणे आणि शुक्राणूंची संख्या गुणवत्ता कमी होणे म्हणजे मोटिलिटी कमी होणे. याला मायक्रोसर्जरीद्वारे ऑपरेशन केल्यास मूल होण्याची शक्यता वाढते.

**स्पर्म वाढण्यासाठी पूरक आहार**
शिंपले (ऑईस्टर), मासे, व्हाईट फिश, केळी, आक्रोड, लसूण, आलं (अदरक) डार्क चॉकलेट, टरबूज, पाईनॅपल ज्यूस, मसाल्याचे पदार्थ इ.

**व्यसने**
स्मोकिंग (धूम्रपान) यामुळे शुक्राणूंच्या संख्येत तसेच गुणवत्तेवर परिणाम होतो. मद्यपान, चीज, कपकेक, सॉसेज इ. मुळेही हा दुष्परिणाम होतो.

* लठ्ठपणामुळे स्पर्म काऊंट कमी होतो.
* वारंवार वीर्यस्खलन झाल्याने स्पर्म कालिटी वाढते.
* लॅपटॉप, मोबाईल यांच्या कंपनांमुळे स्पर्म गुणवत्तेवर परिणाम होतो.
* पुरुषांमध्ये स्पर्मची निर्मिती जिवंत असेपर्यंत होत राहते.
* योनी अंगात गेल्यावर शुक्राणू पाच दिवसांपर्यंत जिवंत राहतात.

नॉर्मली २४ ते ४८ तास स्पर्म हा जिवंत राहु शकतो.

* स्पर्ममध्ये असलेल्या स्पर्मिनमुळे त्याचा वापर कॉस्मेटिकमध्येही होतो.
* स्पर्मची वाढ होण्यास ७५ दिवस लागतात आणि एका सेकंदाला १५०० स्पर्म तयार होतात.

पुरुष किंवा स्त्री वंध्यत्व असेल तरीही प्रथम पुरुषांनी धातूची तपासणी करावी. जेणेकरुन पार्टनरच्या विनाकारण तपासण्या होणार नाहीत.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अॅण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# मशाल रॅलीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारतीय स्वातंत्र्याला 75 वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती तेवत रहाव्या तसेच भारताची फाळणी ही एक शोकांतिका असून शासन आदेशानुसार 14 ऑगस्ट रोजी विभाजन विभीशिका स्मृती दिवसानिमित्त महापालिकेतर्फे फाळणीचे दुःख यावर आधारीत अनोखा उपक्रम आयोजित केलेला आहे. राष्ट्राच्या फाळणीमुळे प्राण गमावलेल्या व मूळापासून विस्थापित झालेल्या सर्वाना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी 14 ऑगस्ट हा दिवस त्यांच्या बलिदानाचे स्मरणदिन म्हणून पाळण्यात येणार आहे.

या बलिदान दिनामुळे भारतीयांच्या वर्तमान आणि भावी पिढयांना या काळात लोकांना भोगाव्या लागणाऱ्या वेदना आणि वेदनाची आठवण होईल म्हणून महापालिकेतर्फे दि.14 ऑगस्ट रोजी सायंकाळी 6.30 वाजता मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मनोहर टॉकीज ते जमनालाल बजाज मार्गापर्यंत रॅली काढण्यात येणार आहे. रॅलीच्या समारोपानंतर जमनालाल बजाज मार्ग येथे भारताच्या फाळणीवर आधारीत फाळणीचे दुःख हा लघुपट दृश्यस्वरुपात मोठ्या पडदयावर प्रक्षेपित केला जाणार आहे. या मशाल रॅलीत नागरीकांनी उत्सुर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन महापौर प्रदीप कर्पे, आयुक्त देविदास टेकाळे यांनी केले आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारांनी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in